# माणूस

शनिवार । २४ फेब्रुवारी १९७९ । ७५ पैसे

एका कामगारनेत्यापासून मध्यवर्ती मंत्रिमंडळात आणि नंतर मिसाराणीच्या मेहेरबानी-मुळे मध्यवर्ती कारागृहापर्यंत धारियांची ही राजकीय सफर घडली. आणीबाणीमध्ये धारियांना कारावास सहन करावा लागला. त्या कारावासामध्ये त्यांनी हे लेखन केलेले आहे. त्यामुळे इंदिरा गांधींनी आणीबाणी जारी करून देशात हुकूमशाही स्थापन करी-पर्यंतचा कालखंडच या पुस्तकास आलेला आहे. आणीबाणीचा कृष्ण कालखंड केव्हा संपेल आणि त्यानंतर देशात कोणती राजकीय परिस्थिती निर्माण होईल यासंबंधी सगळीच अनिश्चितता असताना धारिया यांनी आपला पस्तीस वर्षांचा जीवनालेख काढताना जी निर्भयता व्यक्त केलेली आहे, ती त्या काळातील जीवघेणे दडपण लक्षात घेता, खरोखर स्पृहणीय आहे !

पृष्ठ १९ सफर

प्रदर्शन समितीअध्यक्ष व्हा. ॲड. सॅमसन म्हणाले, "नुसत्या भाराभर मालाच्या उत्पा-दनावर लक्ष केंद्रित न करता आजवर दुर्लक्षित झालेल्या लघुउद्योग व ग्रामोद्योग या दोन्ही भागांवर एकत्रित संस्कार करून त्या त्या विभागांचाही विकास साधायचा आहे. या प्रयत्नात राष्ट्रीयीकृत सहकारी बँका, शासन व छोटे उद्योजक यांच्या सामुदायिक सहकार्याने छोटेमोठे प्रकल्प आकार घेत आहेत ही गोष्टही महत्त्वाची आहे. या प्रदर्शनी-द्वारा देशात उत्पन्न झालेली आत्मनिर्भरतेची, विश्वासाची, उद्योगव्यवसायाबद्दलची प्रबल आकांक्षा यांचे दर्शन घडवणे हेच काम आहे."

मुखपृष्ठ २ यंत्रोद्योग प्रदर्शिनी : दिल्ली

आर्थिक कार्यक्रम सादर करणे आणि मल्टिनॅशनल्सबाबत, इतर राष्ट्रांना दिलेल्या कर्जांबाबत, अमेरिकेशी ठरलेल्या करारांबाबत, प्रतिदिनी सहा कोटी डॉलर्स आणणाऱ्या काळ्या सोन्याच्या विनियोगाबाबत निश्चित धोरण जाहीर करणे व अमलात आणायला सुरुवात करणे याखेरीज इराण पूर्वपथावर येण्याचा संभव नाही. 'राष्ट्रवादी' या घोषणेवर खोमेनीने धर्मयुद्ध जिंकले, पण 'राष्ट्रवादी' हा बहुअर्थी शब्द झाला. जनतेची सहानुभूती त्याच्या बाजूने आहे तोच काही तरी करून दाखवणे अपेक्षित आहे. कारण शेवटी लोकमत हे दुधारी शस्त्र आहे !

पृष्ठ ७ इराण

## साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे-अंक एकूणचाळीसावा

२४ फेब्रुवारी १९७९

मूल्य ७५ पैसे



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

¤

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४ ३४५९

¤


भारतीय यंत्रोद्योग प्रदर्शिनी–दिल्ली

# आत्मनिर्भरतेचे प्रभावी दर्शन

बंडोपंत सरपोतदार

मागील दोन खेपाच्या यशस्वी अनुभवांनी प्रेरित होऊन या वर्षीही भारतीय यंत्रोद्योग महामंडळाने एक भव्य प्रदर्शन दिल्ली येथे भरवले आहे. गेल्या दि. २ फेब्रुवारी ७९ पासून दि. १७ फेब्रुवारी ७९ पर्यंत त्याची कालमर्यादा जरी आता जाहीर झाली असली तरी नेहमीप्रमाणे ती एक महिन्याने वाढविली जाईल असा अंदाज आहे. प्रदर्शनात अवजडापासून अतिसूक्ष्म, परंतु महत्त्वाची अशी विविध यंत्रसामुग्री मांडली असून तंत्रज्ञान, जोडणी, उभारणी, कारागिरी असे बावीस विभाग आहेत. या प्रदर्शनाने दोन लाख स्क्वे. फूट (म्हणजे गेल्या वर्षीपेक्षा दुप्पट) जागा व्यापली आहे. प्रगती मैदानाचे चारही कोपरे देशी–परदेशी कंपन्यांच्या स्टॉल्सनी ओथंबून गेले आहेत.

या प्रदर्शनाचे संयोजन प्रामुख्याने भारतीय यंत्रोद्योग महामंडळ करीत असून त्यांच्या सहाय्यार्थ, १ : ऑल इंडिया ऑटोमोबॉईल अँड अँनसिलियरी इंडस्ट्रीज २ : युनायटेड नेशन्स इंडस्ट्रियल डेव्हलपमेन्ट ऑर्गनायझेशन ३ : नॅशनल इंडस्ट्रियल अँड इंजिनियरिंग एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल आणि ४ : भारत सरकारचे उद्योग-व्यापार व परराष्ट्र व्यवहार-विभाग यांचाही तितकाच हातभार आहे. भारतीय यंत्रोद्योग महामंडळाचे अध्यक्ष श्री. आर. जे. शहानी हे असून उपाध्यक्ष श्री. राहूल बजाज आहेत. प्रदर्शनमंडळाचे कार्यकारी अध्यक्ष व्हाईस अॅडमिरल श्री. सॅमसन आहेत.

महामंडळाच्या प्रमुख निवेदकांनी वार्ताहरांना आपल्या प्राथमिक वृत्तपत्रबैठकीत प्रदर्शनाच्या संकल्पनेबाबत खुलासा करताना सांगितले होते की–

'यापूर्वीच्या प्रदर्शनांमुळे आम्हाला प्रामुख्याने असे जाणवले की, भारतीय मालाला जगात दिवसेंदिवस प्रचंड मागणी आहे. आजपर्यंत प्रगत समजल्या गेलेल्या युरोपीय व अमेरिका–जपान यासारख्या राष्ट्रांकडूनही भारतीय मालाला सतत पुरवठ्याकरिता ऑर्डर्स येत आहेत. भारतीय तंत्रज्ञ, रचनाकार व कारागीर यांनाही काही विशिष्ट कालाकरिता आमंत्रणेही येत आहेत, त्याचबरोबर भारतातील काही खाजगी व सरकारी संस्थांच्या भागीदारीत परदेशांतही मोठमोठे प्रकल्प उभे राहत असून काही तर यशस्वी रीतीने पारही पडले आहेत. भारतीय मालाच्या दर्जाबद्दलही आता वाढता विश्वास वाटू लागला आहे. गेल्या वर्षी सुमारे साठ कोटींचा माल खपला, तर या वर्षी तो सुमारे नव्वद ते शंभर कोटींच्यावर खपेल हीच वरील विश्वासाची निदर्शक बाब समजावी.

'या सर्व मुद्द्यांचा साकल्याने विचार करूनच या वर्षीचे प्रदर्शन आयोजित केले आहे. या प्रसंगी इंग्लंड, युरोपीय देश, रशिया, जपान, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड आदी अठ्ठावीस देश भाग घेत असून त्यांपैकी जवळजवळ सर्वांची अधिकृत औद्योगिक मंडळे भेटी देणार असून त्यांचे चारशेपर्यंत प्रतिनिधी व्यापारी करारही करण्याचा अंदाज आहे.

'यासाठी एकूण अकरा बैठकी भरवण्यात येतील. तंत्रज्ञ, परदेश–व्यापार–व्यवहार, उभारणी व जोडणी, निर्मितीबाबत येणाऱ्या अडचणी व उपाय अशा विषयांचा या बैठकीत विनिमय होईल.'

प्रदर्शिनीत एकूण देशी व परदेशी संस्थांनी पाचशेपर्यंत स्टॉल्स उघडले आहेत. त्यात या वर्षीचे वैशिष्टच म्हणजे लघुउद्योग व ग्रामोद्योग यातील उद्योजकांचा घवघवीत सहभाग! त्यांचे लहान-मोठे, जवळजवळ दोनशेपर्यंत स्टॉल्स आहेत. परदेशी पाहुण्यांची त्यांच्याच स्टॉलसमध्ये गर्दी असते.

प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना (दिनांक २ फेब्रुवारी ७९ रोजी) राष्ट्रपती माननीय नीलम संजीव रेड्डी म्हणाले –

'हे प्रदर्शन म्हणजे आमच्या राष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीची एक उघडी खिडकीच आहे. या प्रसंगी मोठ्या अभिमानाने आपण औद्योगिकदृष्ट्या राष्ट्राची भरारी संतोष-

जनक आहे असे म्हणू शकतो. प्रदर्शन-संयोजकांना, सदस्यांना माझे हार्दिक धन्यवाद देतानाच एक इषाराही द्यावासा वाटतो की, या प्रगतीची मधूनमधून चाचणीही चालू ठेवा व मालाचा दर्जा, विश्वास, प्रगत तंत्राचा अभ्यास या सर्वांनी तिला जपा, तरच हे यश सदाचे गौरवपूर्ण राहील.'

केंद्रीय व्यापारमंत्री मा. मोहन धारिया आपल्या परिचयात्मक अभिभाषणात म्हणाले,

'देशातील वाढत्या औद्योगिक अशांततेची मला जाणीव आहे. म्हणूनच मला उद्योजकांना, तंत्रज्ञांना, कामगारांना, सर्वांनाच विनम्रपणाने सांगायचेय की, आज सर्व जगातच याबाबत परिस्थिती थोडचा-फार फरकाने सारखीच आहे; परंतु आज भारताने मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन, वरील सर्वांनी आपल्या अविश्रांत प्रयत्नांनी हे आव्हान पेलले पाहिजे. शासन त्यांच्या साहाय्यास नेहमीच कटिबद्ध आहे; परंतु त्याच वेळी मला आपणाला याचीही जाणीव, द्यावीशी वाटते की, आज भारतीय मालाचा जो उत्कृष्ट दर्जा व विश्वास निर्माण झाला आहे तो पुढेही नुसता टिकून राहून चालणार नाही, तर वृद्धिंगत झाला पाहिजे. १९६९-७० साली निर्यात व्यापार रु. १०५ कोटींचा होता तो १९७७-७८ साली रु. ६२३ कोटींपर्यंत पोहोचला आणि या वर्षी निश्चितच रु. ७०० कोटींपर्यंत जाईल असा मला विश्वास आहे. या एकाच गोष्टीने आपल्या प्रगतीचे मूल्यमापन सिद्ध केले आहे.'

प्रदर्शन समिती अध्यक्ष व्हा. अॅड. श्री. सॅमसन म्हणाले-

'देशातील लघुउद्योग व ग्रामोद्योग यांच्या जोड-प्रयत्नांनी परदेशांतील निर्यातीत भर घालून देशातील यंत्रोद्योगाचा विकास करणे हा प्रमुख उद्देश या प्रर्शनामागे ठेवण्यात आला आहे. नुसत्या भाराभर मालाच्या उत्पादनावर लक्ष केंद्रित न करता आजवर दुर्लक्षित झालेल्या वरील दोन्ही भागांवर एकत्रित संस्कार करून त्या त्या विभागांचाही विकास साधायचा आहे. या प्रयत्नात राष्ट्रीयीकृत, सहकारी बँका, शासन व छोटे उद्योजक यांच्या सामुदायिक सहकार्याने छोटे-मोठे प्रकल्प आकार घेत आहेत ही गोष्टही महत्त्वाची आहे. या प्रदर्शनीद्वारा देशात उत्पन्न झालेली आत्मनिर्भयतेची, विश्वासाची, उद्योगव्यवसायावद्दलची प्रबल आकांक्षा यांचे दर्शन घडवणे हेच काम आहे.'

या प्रदर्शनात भाग घेणाऱ्या काही परदेशी प्रसिद्ध व्यक्ती म्हणजे-

१. महंमद इस्माईल दानीश (अफगाणिस्थान- मंत्री)

२. श्री. आय. सी. रामप्रशाद (त्रिनिदाद व टॉबार्जीचे संयुक्त कार्यकारी व्यापारमंत्री)

३. श्री. एम. माकाईमा (टांझानियाचे उद्योगमंत्री)

४. श्री. शेख अब्दुल्ला फाऊद (अब्दुल्ला फाऊद या सौदे अरेबियातील बडचा औद्योगिक गटाचे अध्यक्ष)

५. श्री. शेख अब्दुल्ला नास्सर (अबूदाबी-मधील अब्दुल्ला नास्सर या प्रचंड औद्योगिक साम्राज्याचे प्रमुख)

६. श्री. आर. जी. फ्रे (ऑस्ट्रेलियातील औद्योगिक व व्यापारमंडळाचे अध्यक्ष)

७. श्री. झांजीक एम. एम. (युनायटेड नेशन्स इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कौन्सिलचे सभासद)

तसेच-

१. केनया- चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिज

२. इराक- रचना व औद्योगिक महामंडळ

३. डेन्मार्क

४. फ्रान्स

५. इंग्लंड

६. ऑस्ट्रेलिया

७ जर्मनी

८. न्यूझीलंड

९. पाकिस्तान

१०. जपान.

इत्यादी देशांची सुमारे पंचेचाळीस प्रतिनिधिमंडळे प्रदर्शनप्रसंगी होणाऱ्या परिसंवादात भाग घेत आहेत.

जर्मन पीपल्स रिपब्लिकचे बँकिंग अँड फॉरिनट्रेड या विभागाचे जागतिक तज्ज्ञ डॉ. एच्. जे. अॅब्ज हे या प्रसंगी मुद्दाम उपस्थित राहात असून ते पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांच्यासह व्यापार, उद्योग व अर्थव्यवहार या मंत्र्यांनाही भेटणार आहेत.

या भेटीला परदेशी गुंतवणुकीच्या दृष्टीनेही महत्त्व देण्यात येत आहे. आजपर्यंत भारतात आर्थिक गुंतवणूक करण्यास प्रगत देश अत्यंत उदासीन असत. अगदीच तयार झाले तर भलभलत्या जाचक अटींवर. त्यांचा दृष्टिकोन नेहमीच संशयी असे. युरोपियन बाजारपेठेत भारताच्या रशियन मैत्रीची मोठीच भीती असे; परंतु आता परिस्थिती निवळू लागली आहे.

आफ्रिकेमध्ये जसजसा नवीन नवीन स्वतंत्र राष्ट्राचा उदय होतो आहे, पेट्रोलच्या समृद्धीमुळे मध्यपूर्वेची राष्ट्रे आधुनिक विचारांनी प्रेरित होऊन जसजसा आपला विकास करू लागली आहेत, तसतसे युरोप व अमेरिका यांची दृष्टी भारताच्या सहाय्यार्थ वळणे साहजिकच आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने जगाची बाजारपेठ आपल्या हुकमतीखाली आणली होती; पण गेल्या पंधरा-वीस वर्षांत पुन्हा जर्मनी व जपान या राष्ट्रांनी आपले आसन हळूहळू मजबूत करत आणले आहे. जर्मनीने तर आर्थिक आघाडीवर अमेरिकेपुढे घोडदौड केली असून आपल्या आर्थिक गुंतवणुकीचा मोर्चा आता पूर्वेकडे वळवला आहे. या दृष्टीने डॉ. अॅब्ज यांच्या भारतभेटीला जास्त महत्त्व दिले जात आहे. डॉ. अॅब्ज यांच्यासमवेत जर्मन चेंबर्स ऑफ कॉमर्सचे प्रतिनिधी व डुसेलडॉर्फ हाम्बुर्ग फेअर्सचे सभासदही आहेत.

गेल्या आठवडचात प्रदर्शनप्रसंगी चौकशी, प्रत्यक्ष मालनोंदणी, व्यापारी स्वरूपाचे तात्पुरते व काही कायम स्वरूपाचे करार झाले. ही उलाढाल अंदाजे पाचशे कोटीपर्यंत झाली असावी. यात अवजड यंत्रोद्योगी जहाजबांधणी, रेल्वेचे डबे, इंजिने, इलेक्ट्रिक मोटार्स वगैरे आणि लघुउद्योगात गेअर हॉबिलिंग सेंट्रल-ड्रीलिंग टूल्स, निरनिराळचा आकाराची डंपर्स, मोटर्स, ट्रान्सफॉर्मर्स, हाय व्होल्टेज टेस्टर्स, जनरेटर्स या साहित्याचा समावेश आहे अर्थात यांचे प्रमुख ग्राहक मध्यपूर्वेची अरब राष्ट्रे, आफ्रिकेतील केनया, युगांडा, टांझानिया वगैरे आणि इराक, अफगाणिस्तानसारखे देशही आहेत. आबूदाबी, सौदे अरेबियामध्ये यंत्रोद्योगाबरोबर रस्ता-घरेबांधणीपासून धान्य, फळे यांसारख्या जीवनोपयोगी तंत्रज्ञ, डॉक्टर्स, इंजिनिअर्स वगैरेंचीही मागणी मोठचा प्रमाणावर आहे.

दि. १२ फेब्रुवारीपासून सुरू असणाऱ्या पाच दिवसांच्या 'तंत्रविज्ञानाचा सहकारी विकास' या विषयाच्या चर्चासत्रात भारत सोडून आणखी सोळा राष्ट्रे भाग घेत आहेत. भारताचे श्री. राहुल बजाज यांची अध्यक्षपदी व ऑस्ट्रेलियाचे श्री. आर. जे फ्रे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली असून भारत सरकारचे व्यापारविभागाचे चिटणीस व अर्थतज्ज्ञ श्री. एस. एस मराठे, UNIDO चे आशियाचे प्रतिनिधी श्री. एम. एम. झांजिक हे या चर्चा-सत्रात प्रामुख्याने भाग घेतील. १९७५ साली लिमा येथे झालेल्या युनायटेड नेशन्स इंडस्ट्रिअल अँड ट्रेड कॉन्फरन्समध्ये जाहीर झालेल्या ठरावाच्या अनुरोधाने या चर्चासत्राचे काम व्हावे अशीच बहुजनांची इच्छा दिसली.

चर्चासत्रात युनिडो (UNIDO), इस्कॅप (ESCAP) याशिवाय ऑस्ट्रेलिया, भारत, बांगला देश, जपान, मलेशिया, नेपाळ, कोरिया, श्रीलंका, थायलंड, व्हिएतनाम आदींच्या तीस सभासदमंडळांचा समावेश आहे.

याशिवाय चालू पंधरवडचात अशीच सात लहान-मोठी चर्चासत्रे झडणार आहेत. □

संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# इवलेसे रोप

काही लोक निसर्गावर प्रेम करतात तर काही लोकांवर निसर्गाचे प्रेम असते; पण निसर्गावर प्रेम आहे आणि निसर्गाचेही आपल्यावर प्रेम आहे असे लोक विरळ ! या विरळ लोकांत आमची मावशी होती. तिने कुठल्याही मातीत कसलेही बी लावावे, त्याचा 'वेलु गगनावेरी'च जावयाचा. ते केवळ फोफावयाचेच नाही तर 'फुले वेचिता भार कलियांसी आला' अशी अवस्था व्हावयाची. तिच्या गाठोड्यातील पुरचुंड्यांतून नाना तऱ्हेच्या बिया असत. ज्या घरी ती पाहुणी जाई तिथल्या अंगणात ती त्या पेरी. पाहुणचार संपला की ती निघून जाई. यथावकाशाने तिथे वेल किंवा वृक्ष उगवून शेंगा, भाजी किंवा फळे यांची रेलचेल होई. मावशी पुन्हा त्या घरी पाहुणी येईपर्यंत घरातली माणसं तिची आठवण काढीत रहात व तिच्या सांगण्याप्रमाणे शेंगा किंवा फळे यांतल्या बिया राखून ठेवीत. मावशी पुन्हा त्या घरी आल्यावर साठवलेल्या त्या बिया घेऊन त्या पेरायला पुढच्या घरी पाहुणी जाई.

मला वाटते, वृक्षारोपण करावयास निघालेल्या संस्थांनी, कारखान्यांनी, ग्रामपंचायतींनी किंवा सरकारने आमच्या मावशीसारखी माणसे आणून त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करावे म्हणजे 'लावलेली शेकडो रोपे जळून गेली, खुरटली' अशा ज्या बातम्या अधूनमधून येतात त्या येणार नाहीत. आता प्रश्न एकच पडेल की, मावशीसारखी माणसे कुठे शोधावयाची ? त्याचे उत्तर आहे शहरांतील चाळींच्या खुराड्यांतील किंवा कोंदट वाड्यांतील इवल्याशा जागांतून जिथे जिथे बादल्या, टिनचे डबे, कुंड्या यांतून रोपे लावलेली दिसतात तेथे अशी माणसे मिळावीत.

मावशीच्या गाठोड्यात बिया असत तसेच रंगीत बाटल्यांतून ठेवलेले निसर्गोपचाराचे पाणी असे. कुठेही, अंगणात किंवा गच्चीवर उन्हात ठेवलेल्या रंगीत बाटल्या दिसल्या की, तिथे आमची मावशी आली आहे असे समजण्यास हरकत नव्हती. हिरव्या, तांबड्या, पिवळ्या, निळ्या अशा विविध रंगांच्या त्या बाटल्या असत. त्यांत पाणी घालून ऐन उन्हात म्हणजे, बारा ते दोन किंवा एक ते तीन अशा वेळात त्यांना ती उन्हं देई. दोन तास झाले की, त्या बाटल्यांवर पोते टाकून, पोत्याच्या अंधारात गुंडाळून त्या ती घरात आणी व घरातील अंधाऱ्या जागेत ठेवी. मग इसब, नायटे, गळू, डोकेदुखी वगैरे रोगांवर त्या त्या रोगासाठी असलेल्या रंगीत बाटलीतील पाणी पिण्यास देई किंवा त्याच्या घड्या ठेवी.

दर महिन्यास एकदा संध्याकाळी स. प. विद्यालयाच्या आवारात एकतीस नंबरच्या खोलीत जमणाऱ्या निसर्गप्रेमी मंडळीत माझी मावशी अध्यक्ष म्हणून शोभली असती. असाच मी एकदा या मंडळींच्या बैठकीला गेलो तेव्हा तिथे बारा-चौदा मंडळी जमली होती. बहुधा एवढेच लोक दर वेळेच्या मासिक बैठकीला येत असावेत. म्हणजे पुण्याच्या लोकसंख्येच्या दृष्टीने पाहता ही हजेरी लाखास एक अशाही प्रमाणात पडत नव्हती ! याचा अर्थ लाखांतील एका नागरिकाला अपायकारक औषधांवाचून आरोग्य राखावे, शहरातील कचराकुंडी स्वच्छ असावी, नदीचे पाणी वाहते असावे, झाडांची तोड होऊ नये असे वाटते, असे निश्चितपणे म्हणता येईल. लाखात असा एकच नागरिक निघावा हे कुणाला ठीक वाटणार नाही; पण माझे समाधान आहे. पाच लाखांत एक निसर्गप्रेमी निघण्यापेक्षा ही संख्या मोठी आहे आणि दहा लाखांत असा एक नागरिक निघण्यापेक्षा खूप आशादायक आहे.

निसर्गप्रेमी मंडळाच्या आजच्या सभेत स. प. कॉलेजचे प्राध्यापक डॉ. कावळे यांचे भाषण होते. त्यांनी 'लाइफ नॅचरल' या दक्षिणेत निघणाऱ्या मासिकातील 'स्कॅनिंग दि न्यूज' या सदरातून काही विषय निवडून भाषण दिले. कलकत्ता व इतर शहरांतील प्रदूषण–चीनमध्ये वापरात असलेले ग्रीन मॅन्युअर–टॉनिक टोनिंगअप करीत नाहीत–टॉनिक हे अन्न नव्हे–गर्भपात प्रतिबंधक गोळ्यांचे दुष्परिणाम–झोप बेताची घ्यावी–धोरणे वाईट–हवाई स्नानाचे महत्त्व अशा विषयांवर ते बोलले. भूक लागली तर खावे–भूक नसताना खाणे म्हणजे रोगाला निमंत्रण –भूक लागते याचा अर्थच तुमची प्रकृती चांगली आहे. आठवड्यातून निदान एकदा तरी उपवास म्हणजे निराहार करा. भाज्या-फळे कच्ची खावीत. स्टार्च खाऊ नये, असे नैसर्गिक आरोग्याचे काही नियम व तत्त्वे त्यांनी विशद करून सांगितली.

डॉ. कावळे यांचे भाषण झाल्यावर प्रश्नोत्तरेही झाली. गर्भप्रतिबंधक गोळ्यांबद्दल चर्चा झाली. श्रोत्यांत तरुण व वृद्ध दोन्ही मंडळी होती. त्याचे मला बरे वाटले. निसर्गोपचार, अध्यात्म, वसंत व्याख्यानमाला-ज्योतिष वगैरे म्हातारपणचे विषय आहेत ही कल्पना गेली पाहिजे ! जर तुम्ही तरुणपणी ज्ञानेश्वरी समजावून घेतली असेल तर तुम्हाला म्हातारपणी त्यात रस घेता येईल. नाही तर तिचा कंटाळाच येईल. मागील आयुष्यात तुम्ही निसर्गोपचारांनी आरोग्य राखले असेल तरच म्हातारपणी निसर्गोपचारांपासून खरा लाभ होईल. आपल्याला म्हातारपण ज्यात घालवावयाचे असे वाटते त्या गोष्टींची सवय तरुणपणापासून करायला हवी.

मावशीचा काळ बघता आज तिच्या झाडे लावण्याचे आश्चर्य वाटते. (भाजी निवडताना जर शेंगेत जून बी मिळाली तर ती लगेच अंगणात जाऊन पुरून येई.) तिच्या वेळी आजच्याइतकी झाडांची तोड झालेली नव्हती. आमच्या गावाजवळचे डोंगर वृक्ष-वल्लींनी भरलेले होते तेथील रानात वनगाई, वाघ, लांडगे, कोल्हे वगैरे होते. रस्त्याच्या दुतर्फा आंबे, चिंचा, जांभळे यांचे वृक्ष दाटीने उभे होते. तरीही ती झाडी कमी वाटून ती बिया पेरीतच होती. तसेच त्या काळी अँटिबायोटिक्स किंवा अॅस्पिरीन नव्हते. सुंठ उगाळून लावणे, मात्रा घेणे असे उपचार होते. तरीही उन्हात ठेवलेल्या पाण्याचे निसर्गोपचारात बसणारे औषध ती देत होती. रंगीत बाटल्यांतील पाण्याचे शास्त्र ती कुठे शिकली ठाऊक नाही. शिवाय आज जे उपवासाचे शास्त्र आहे ते उपवासही ती करीत असे.

वृक्षारोपण, उन्हातले पाणी किंवा उपवास या विषयांचे तिला शास्त्रीय ज्ञान नव्हते. नैसर्गिकरीत्या तिला जे वाटत होते ते ती करीत होती. फळझाडे, फुलझाडे, वृक्ष लावले पाहिजेत, आपल्याला हवं नको ते आपणच ओळखून आपले आरोग्य राखले पाहिजे, या प्राथमिक भावनांतून ती या गोष्टी करीत आली होती. आज तिच्यासारखी माणसे थोडी दिसतात ! ती सहज करीत होती त्या गोष्टी आज चळवळ म्हणून कराव्या लागत आहेत. याचा अर्थ आपल्या सहज भावना सुकून गेल्या आहेत. निसर्गाशी आवश्यक असलेली जवळीक उरली नाही; पण कल्पनांची ही नवी व्याप्ती मावशीला नव्हती. तिला हे शब्द कळलेही नसते. आपण काही विशेष करीत आह'त याची कल्पना तिला नसली तरी निसर्गाच्या व पर्यायाने माणसाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने तिने जे केले ते करण्याची केवढी आवश्यकता निर्माण झाली आहे हे आपण पहातोच आहोत.

निसर्गाशी वागण्याच्या दोन तऱ्हा आहेत. एक, तो धोका समजून वागणे. दुसरी तऱ्हा प्रेमाने वागणे. जागतिक शास्त्रज्ञांच्या एका जागतिक परिषदेत अध्यक्षांनी एक धोक्याचा इषारा दिला तो मला आठवतो आहे. त्यांचे म्हणणे—आपण माणसं आज स्वतःला प्राणीसृष्टीत अजिंक्य समजत आहोत; पण जर आपण जरा बेसावध राहिलो तर मुंग्या, झुरळं, कीटक हे आपण क्षुद्र मानतो तेच म्हणता म्हणता माणसांना नष्ट करून पृथ्वी व्यापतील. यासाठी माणसाने सदैव सावध राहून या प्राण्यांना काबूत ठेवले पाहिजे!

याउलट निसर्गाशी प्रेमाने आणि समजुतीने वागा, असे सांगून दुसऱ्या एका शास्त्रज्ञाने म्हटले आहे की, निसर्गाला ओरबाडू नका! पृथ्वी ही अंतरिक्षात अधांतरी फिरते. तिच्यावर जे काही चराचर आहे त्यात कसलीही भर घालता येणार नाही. तिच्या पोटात जे धातू आहेत, जे कोळसे आहेत त्यांचा साठा मर्यादित आहे. पृथ्वीवरचे जे आहे ते केव्हातरी संपणार आहे. माणसाने तिच्या पोटातील खाणी रिकाम्या केल्या, तिचे समुद्र दूषित केले, अॅटमबाँबने ती जाळली तर त्याची भरपाई होणार नाही. म्हणून तिला ओरबाडू नका.

शास्त्रज्ञांचं यातलं कुठलंच म्हणणं मावशीच्या कानांवर नव्हतं.

निसर्गप्रेमी लोक इषारे व धोक्याच्या सूचना देत आहेत; पण कुणी ऐकत नाही. हिताचे न ऐकणे ही गोष्ट प्राचीन आहे. महाभारतातही "ऊर्ध्वबाहु विरामोश्च नहि कश्चित् शृणोति माम्" असे म्हणावे लागले. पण निसर्गप्रेमी लोकांचे म्हणणे ऐकूनही माणसाने काय करावे, निसर्गाला आव्हान द्यावे की प्रेमाने वागावे याचा निर्णय मला करता आलेला नाही. हा महाभयंकर प्रश्न आहे. निसर्गाला आव्हान देऊन न जिंकावं तर माणसाची प्रगती होत नाही आणि जिंकावं तर माणूस नष्ट होतो. पृथ्वीवरील नैसर्गिक संपत्ती मर्यादित आहे व ती केव्हा तरी संपणार आहे हे जाणून माणसाने टिकून राहण्यासाठी योजना केलीच पाहिजे. त्यासाठी माणूस व निसर्ग यांच्यातील नात्याचा पुनर्विचार करायला पाहिजे. हा नवा विचार मिळेपर्यंत तग धरण्यास, माझी मावशी किंवा स. प. महाविद्यालयाच्या आवारातील नंबर एकतीसच्या खोलीत जमणाऱ्या या बारा-तेरा मंडळींची कास आपणास धरावी लागेल. त्यांचा हा वेलु फोफावेल असे करावे लागेल. कारण शास्त्रज्ञांच्या बारेमाप उत्साहाला, राजकारण्यांच्या महत्त्वाकांक्षांना, उद्योगपतींच्या लोभाला आणि आपल्या सर्वांच्या चैनी वृत्तीला या लोकांचा बांध उपकारक ठरेल. ही मंडळी काय म्हणतात हे आपण ऐकले पाहिजे व तसे केले पाहिजे. झेपतील ते निसर्गोपचार स्वीकारले पाहिजेत. ही निसर्गोपचारप्रेमी मंडळी फॅडिस्ट आहेत असे पुष्कळजण म्हणतील; पण उठल्यासुटल्या टॉनिके, इंजेक्शने, गोळचा घेणारेही फॅडिस्ट का नाहीत असे ते विचारतील !

या निसर्गोपचारप्रेमी मंडळींचे सेक्रेटरी हे सत्तरीचे असावेत. निसर्गोपचाराचा उपयोग होतो हे दाखवणारेच त्यांचे आरोग्य आहे. ते उत्साही आणि खटपटी आहेत. तिथेच त्याने विक्रीसाठी टांगून ठेवलेले एनिमाचे भांडे त्याची साक्ष देत होते. अतिशय सुटसुटीत व थोडक्या पैशात मिळणारे ते भांडे होते. एका वीतभर उंचीच्या स्टेनलेसच्या ग्लासला अडकवण्यास कडी केलेली होती व ग्लासच्या तळात भोक पाडून एनिमाची नळी बसवलेली होती. त्याची किंमत फक्त दहा रुपये त्यांनी सांगितली. ज्यांना एनिमा नित्य घ्यायचा असतो त्यांना ते चांगले होते. एनिमा हा निसर्गोपचारात आवश्यक आहे असे धरतात. तसेच हे गृहस्थ काही किरकोळ फी घेऊन निसर्गोपचाराच्या बाबतीत मार्गदर्शन करतात.

□

मध्यंतरी लाइफ नॅचरल हे मासिक वाचले. या निसर्गोपचाराच्या दोन गोष्टी मला आवडल्या. एक त्यांचा मोठा आवाका—वैयक्तिक उपचाराइतकेच त्यांचे लक्ष शहरातील प्रदूषण, जगाची नैसर्गिक संपत्ती इत्यादींकडेही आहे. निसर्गोपचार हा त्यांना मोठ्या मानवी तत्त्वज्ञानातला एक भाग आहे.

मला त्यांची दुसरी गोष्ट आवडली. जर मी निसर्गोपचार सुरू केला तर माझ्या शरीरावर माझे नियंत्रण राहण्याचा आनंद मला मिळणार आहे. माझे परावलंबित्व त्यामुळे जाणार आहे. माझ्या शरिरात काय होतंय हे माझे मी पहाणार आहे. त्यासाठी आपला नंबर येण्याची दोन तास वाट पहात मला दवाखान्यात बसावे लागणार नाही ! दहा तऱ्हेच्या गोळ्यांचा महिना महिना कोर्स घेण्यापेक्षा प्राणायामाचा व आसनांचा आनंददायी मार्ग मी घेणार आहे. खोल श्वास घेऊन सोडीत मीच माझी फुप्फुसे स्वच्छ हवेने विसळून साफ ठेवणार आहे. रेचकाच्या वेदनादायक गोळ्या न घेता मी कच्चा भाजीपाला खाऊन कोठा मोकळा करणार आहे. शिजवून, उकळून अन्नातील सत्त्वे न घालविता मी धान्ये भाजून खाणार आहे. मद्य, सिगारेट, तंबाखू, गांजा, अफू, सुपारीसुद्धा सर्व असती नसती व्यसने मी सोडणार आहे. मग व्यसने नसण्याचे व्यसन मला लागले आहे अशी कुणी खुशाल चेष्टा करो !

हे सर्व करीत निसर्गप्रेमी लोकांत मला दाखल व्हावयाचे आहे. त्यांचे जगद्व्याळ तत्त्वज्ञान मला अंगिकारावयाचे आहे; पण तोपर्यंतच्या काळात मी माझ्या मावशीच्या पावलावर पाऊल टाकणार आहे ! सकाळी उठताच सूर्याकडे एक मिनिट टक लावून बघणार आहे. त्यायोगे माझे डोळे निरोगी राहतील. रंगीत बाटल्यांतील पाणी तयार करून शरिरात रोग होताच त्यावर घड्या ठेवणार आहे.

मावशीसारख्या बियाही मला लावायच्या आहेत. सर्वत्र हिरवेगार करावयाचे आहे; पण एकेक ! सवडीने ! □

## मुंबई वार्ता

विनय सहस्रबुद्धे

# □ कोकण नंदनवन

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या महाराष्ट्रातील व्यापार–उद्योग क्षेत्राच्या प्रातिनिधिक संघटनेची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा या महिन्याच्या प्रारंभी मुंबईत पार पडली. या सभेत चेंबरचे अध्यक्ष श्री. बा. म. गोगटे यांचे जे अध्यक्षीय भाषण झाले, ते खरोखरच ऐकण्याजोगे होते. केवळ अध्यक्षांचे भाषण म्हणूनच त्याचे महत्त्व आहे असे नसून श्री. गोगटे यांनी या भाषणात ज्या नव्या योजना सुचविल्या आहेत, महाराष्ट्राच्या व विशेषत: कोकणच्या विकासाच्या दृष्टीने जे नवे प्रकल्प सुचविले आहेत, ते विशेष महत्त्वाचे आहेत.

श्री. गोगटे यांच्या भाषणाचा पूर्वार्ध माहितीपूर्ण आहे. देशातील गतसालातील आर्थिक परिस्थितीचा त्यांनी सर्वसाधारण आढावा घेतला आहे आणि तो घेताना आर्थिक परिस्थितीचे यथायोग्य मूल्यमापन केले आहे. कृषिआघाडीवर तेलबियांचे उत्पादन कमी प्रमाणात होत असल्याने गतवर्षी ८०० कोटी रुपयांच्या तेलबियांची आयात करावी लागली. त्यामुळे विदेशी चलनाच्या गंगाजळीवर पडलेला भार दुर्लक्षणीय नाही. श्री. गोगटे यांनी तेलबियांबरोबर डाळींच्या उत्पादनात अधिक प्रगती करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. १९७८ मध्ये औद्योगिक उत्पादनाच्या निर्देशांकात जी वाढ झाली त्याबद्दलही श्री. गोगटे यांनी समाधान व्यक्त केले आहे.

जनता पक्षाच्या राजवटीत औद्योगिक व राजकीय क्षेत्रात जी अस्थिरता निर्माण झाली आहे, त्याबाबत या भाषणात चिंता व्यक्त करण्यात आली आहे. महत्त्वाच्या बड्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करण्याबाबत रोज नवे मंत्री नवी विधाने करीत असतात व या गोंधळात नेमके धोरज अस्पष्टच रहाते.

श्री. गोगटे यांच्या भाषणात औद्योगिक क्षेत्रातील असुरक्षिततेबद्दलही तीव्र चिंता व्यक्त करणारे विवेचन आहे. श्री. गोगटे म्हणतात, 'कामगार व कारखानदारांत मतभेद असतील, पण ते विधायकतेने व विचारविनिमयातून दूर करण्याची आवश्यकता आहे....' श्री. गोगटे यांचे विचार योग्यच आहेत, पण हे मतभेद दूर व्हावेत यासाठी खुद्द चेंबर ऑफ कॉमर्स काय करीत आहे हे स्पष्ट झालेले नाही. चेंबर ऑफ कॉमर्ससारख्या संघटना हा जटिल प्रश्न सोडविण्यासाठी सक्रिय बनण्याची गरज आहे. नुसता खेद व्यक्त करण्याने काय साधणार ?

लघुउद्योजकांना जनता सरकारच्या कारकीर्दीत बरे दिवस आले आहेत; पण उद्योगक्षेत्रातील वाढत्या स्पर्धेत टिकाव लागण्याच्या दृष्टीने श्री. गोगटे यांनी आपल्या भाषणात लघुउद्योगांसाठी आणखी काही सवलतींची मागणी केली आहे. नव्या अर्थसंकल्पात लघु–उद्योजकांसाठी काही सवलती अशा असाव्यात की ज्यामुळे या क्षेत्रातील उत्पादनाचा भांडवली खर्च आटोक्यात रहाण्यास मदत होईल ही या बाबतची एक नोंदणीय सूचना आहे. लहान कंपन्यांचा रु. ५० हजारपर्यंतचा नफा करमुक्त असावा ह्या अध्यक्षीय भाषणातील सूचनेबाबत मात्र अधिक विचार व्हायला हवा. कारण मग अशी सवलत दिली की, वाटेल त्या खटपटी–लटपटी करून आपला नफा ५० हजार रु. च्या आत 'दाखविण्याचा' प्रयत्न अशा उद्योजकांकडून सुरू होईल व त्यामुळे आयकर उत्पन्नात मोठ्या प्रमाणावर घट येईल.

महाराष्ट्रातील व्यापार–उदीमाच्या विकासाला हातभार लागावा म्हणून अध्यक्ष श्री. गोगटे यांनी आपल्या भाषणात काही उल्लेखनीय सूचना केल्या आहेत. दक्षिण महाराष्ट्रातील सांगली–मिरज भागात उद्योगधंद्यांचे जाळे वाढत आहे व त्यामुळे पूर्वीचा सांगली–मिरज रेल्वेमार्ग पुन्हा सुरू केला जावा ही मागणी गोगटे यांनी आपल्या भाषणात मांडली आहे. मिरज–पुणे मार्गाचे रुंदीकरण झाल्यानंतर जुना मार्ग बंद पडला आहे; परंतु जुन्या मार्गाची सोय लक्षात घेऊनच अनेक उद्योगव्यवसायांच्या जागा ठरविण्यात आल्या आहेत, हे लक्षात घेता ही मागणी अनाठायी वाटणार नाही. श्री. गोगटे यांनी धुळे–अंमळनेर या दोन व्यापारी शहरांना जोडणाऱ्या लोहमार्गाची मागणी केली आहे. धुळे शहराचा विकास खुंटण्यामागे जी अनेक कारणे आहेत त्यात धुळे शहर मुख्य लोहमार्गावर नाही हे एक महत्त्वाचे कारण आहे. साहजिकच धुळे शहर लोहमार्गाच्या जाळ्यात आणण्याचा अग्रक्रमाने विचार व्हायला हवा; परंतु श्री. गोगटे म्हणतात त्याप्रमाणे धुळे–अंमळनेरऐवजी धुळे–नरडाणा रेल्वेमार्ग अधिक सोयीचा ठरेल. याचे कारण धुळे–नरडाणा अंतर अधिक कमी आहे आणि सुरत या व्यापारी केंद्रासही नरडाणा अधिक जवळचे आहे. काही वर्षांपूर्वी धुळे–नरडाणा लोहमार्गाची योजना स्थानिक नेत्यांनी केंद्राकडे सुचविलीही होती.

या भाषणातील सर्वाधिक appealing सूचना कोकणचा कॅलीफोर्निया करण्याबाबतची. यासाठी कोकण नंदनवन महामंडळ या नावाच्या नव्या महामंडळाचा सविस्तर आराखडा श्री. गोगटे यांनी मांडला आहे. कोकणच्या पश्चिमवाहिनी नद्यांना धरणे बांधता येत नाहीत; परंतु प्रचंड पावसातून पडणाऱ्या पाण्याची लहान लहान

पृष्ठ २३ वर

मुक्काम : पुणे

# वर्णभेद : मानवी हक्कांची पायमल्ली

## एक अभ्यासपूर्ण परिसंवाद

संयुक्त राष्ट्रसंघटनेने मानवी हक्कांची सनद मान्य करून तीस वर्षे होऊन गेली आहेत; पण अजूनही कित्येक देशांमध्ये लोकशाही हक्कांची पायमल्ली होतच असल्याचे आढळून आले आहे. मानवी हक्कांवर निर्बंध नाहीत असा एकही देश जगात नाही असे ह्या संस्थेस वाटते. म्हणूनच १९७९ साल हे आंतरराष्ट्रीय स्तरावर 'वर्णभेद निर्मूलन वर्ष' मानण्यात येणार आहे.

पुणे विद्यापीठाने याच आंतरराष्ट्रीय प्रश्नावर १० फेब्रुवारीला एक परिसंवाद आयोजित केला होता. परिसंवादाचा विषय होता 'वर्णभेद : मानवी हक्कांची पायमल्ली.' परिसंवादाचे उद्घाटक होते निवृत्त न्यायमूर्ती श्री. हिदायतुल्ला. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू श्री. राम ताकवले यांनी प्रथम विषय स्पष्ट केला. हिदायतुल्ला यांनी आपल्या उद्घाटनाच्या भाषणात वर्णभेदावर कडक टीका केली. ते म्हणाले, 'जगात इतरत्र कोठेही घडणारा अन्याय हा आपल्या इथे घडणाऱ्या अन्यायाइतकाच महत्त्वाचा मानला पाहिजे आणि त्याविरुद्ध आवाज उठविला पाहिजे. आज दक्षिण आफ्रिकेतील गोरी राजवट तिथल्या मूळ रहिवाश्यांची पिळवणूक करते आहे. गोऱ्यांना शिक्षण-नोकऱ्यांमध्ये खास राखीव स्थान आहे. उच्चपदे त्यांच्यासाठी राखून ठेवण्यात येतात. काळचा आणि गोऱ्या समाजाच्या राहण्याच्या जागा वेगवेगळ्या आहेत आणि काळ्यांना गोरा समाज आपल्या हद्दीत पाय देखील ठेवू देत नाही! याविरुद्ध आवाज उठविणारे किती तरी नेते तुरुंगात आहेत आणि जगाला या प्रश्नावर काहीही करावेसे वाटत नाही, अशी वस्तुस्थिती आहे!

'दक्षिण आफ्रिकेत जगातील सोन्याच्या उत्पादनापैकी ६५% सोन्याचे उत्पादन केले जाते. हिऱ्यांच्या खाणीही तेथे आहेत. युरेनिअमसारख्या महत्त्वाच्या द्रव्याच्या खाणी आहेत येथे काम करणारे मजूर आहेत काळी माणसे आणि इंडियन; पण यापासून मिळणाऱ्या संपत्तीचा स्रोत मात्र वाहतो गोऱ्यांकडे! तिथल्या गोऱ्या राजवटीला लोकशाहीबद्दल एक भीती आहे. कारण तिथे काळे आणि गोरे यांचे प्रमाण ६ : १ आहे. जर लोकशाही तेथे आलीच तर राज्ययंत्रणा अर्थातच बहुमतवाल्यांच्या हातात जाईल आणि गोरी राजवट संपुष्टात येऊन सत्तेबरोबर येणारे फायदेही संपुष्टात येतील!

'युनोच्या पाहणी समित्यांना तेथे परवानगी नाकारली जाते. आपल्या देशाला ह्या समस्येत विशेष काही करता येईल. भारतातील विद्यापीठातून तेथील विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सवलती देऊन शिकवता येईल. कोठल्याही लढ्याला दिशा देण्याची गरज असते आणि त्यासाठी शिकलेल्यांची आवश्यकता असते. अशा लोकांना आपली विद्यापीठे तयार करू शकतील. त्यांना लढा चालू राहावा म्हणून पैशाचीही मदत करता येईल!'

न्यायमूर्ती हिदायतुल्ला अतिशय विस्तृतपणे या विषयावर बोलले. आता ह्या विषयावर अधिक कोण काय बोलणार अशी शंका नेहमीच येत होती; पण प्रत्येक वक्ता वेगवेगळा मुद्दा आपल्या भाषणातून मांडत होता. ह्यानंतर बोलला युगांडातील एक 'काळा विद्यार्थी!' चार्लसने दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या अत्याचारांवर हल्ला चढवला. तो म्हणाला, 'आम्हा काळ्यांवर इतकी नियंत्रणे आहेत की बस! केवळ संशयावरून पोलीस कोणालाही अटक करतात आणि गजाआड टाकतात. यासाठी वॉरंटचीदेखील काही आवश्यकता पडत नाही. तुरुंगात अनेक प्रकारे छळ करण्यात येतो. पोलिसी राज्यच तेथे चालू आहे. गोरे आणि काळे विद्यार्थी यांच्यासाठी वेगळ्या शाळा, वेगळे शिक्षण. गोऱ्यांना शिक्षण मोफत आणि सक्तीचे आहे आणि काळ्यांना मात्र तो अधिकार नाही!

जमिनीचे वाटपही अशाच धर्तीवर केले गेले आहे. ७२ टक्के असलेल्या काळ्या नागरिकांना देशातली फक्त १३ टक्केच जमीन देण्यात आली आहे आणि गोऱ्यांच्या ताब्यात असलेली जमीन सुपीक आहे. हा अन्याय नाही तर काय?'

आपल्या आवेशपूर्ण भाषणात चार्लस पुढे म्हणाला, 'आमच्या इथली खनिजसंपत्ती लुटून नेऊन इतर देश आपली प्रगती झाल्याचा आव आणतात, मोठ्याने पुकारा करतात; पण इकडे मात्र शोषित लोकांचे शोषण जास्तच वाढत असते. काळ्यांना गोऱ्यांपेक्षा अतिशय कमी वेतन मिळत असते.

शेवटी आपल्या भाषणात त्याने उपस्थित केलेला मुद्दा फारच महत्त्वाचा होता, 'आम्ही काय करणार आहोत हा खरा प्रश्न आहे. चार भिंतीत बसून आम्ही फक्त चर्चाच करणार आहोत का? जर तेथे प्रत्यक्ष मदत करता येत नसेल तर लढा चालू ठेवायला मदत करा! स्वातंत्र्ययोद्ध्यांना, निर्वासितांना आश्रय द्या! विद्यार्थ्यांना शिकवा!'

चार्लस्च्या आवेशपूर्ण भाषणानंतर बोलले 'सकाळ'चे संपादक श्री. ग. मुणगेकर. त्यांनी राजकीय प्रश्नांची आपल्या भाषणात उकल केली. 'अनेक युरोपियन कंपन्यांनी ह्या देशात भांडवल गुंतवले आहे. अनेकांचे अनेक प्रकारचे 'इंटरेस्टस्' इथे गुंतलेले आहे. दक्षिण आफ्रिकेकडे अमेरिका संरक्षणाच्या दृष्टिकोनातून पाहते. तिथे त्यांनी तळ उभारला आहे. आपल्या संरक्षणसाखळीतला दुवा निखळू नये म्हणून ते सरकार धडपड करते. अमेरिकेने दबाव आणला तरच दक्षिण आफ्रिकेच्या धोरणात बदल शक्य आहेत. कार्टर ह्यांनी 'मानवी हक्कांची जपणूक' करण्याचे आश्वासन दिले आहे खरे; पण अमेरिकेचे धोरण अजूनही बदललेले नाही!'

आपल्या विवेचनाचा शेवट करताना ते म्हणाले, 'आता फक्त सशस्त्र लढाच दक्षिण आफ्रिकेची छळापासून मुक्तता करणार आहे आणि शेजारील राष्ट्रांच्या मदतीनेच हा लढा यशस्वी होणार आहे. कदाचित गोऱ्यांच्या नव्या पिढीला ह्या नव्या जाणिवांची ओळख पटेल. अन्यायाची चीड येईल आणि व्हिएट-नामच्या बाबतीत अमेरिकेत जी लोकांची प्रतिक्रिया घडली तशीच येथेही घडेल!'

अर्थात हे सगळे 'जर-तर'चे झाले. प्रत्यक्षात काय घडणार आहे हे काळच ठरवू शकणार आहे. प्रो. शहा आणि वनस्पतिशास्त्रविभागाचा एक विद्यार्थी गायकवाड ह्यांनी हा प्रश्न भारतातील अस्पृश्यता या विषयाशी जवळचा आहे' असे सांगितले. प्रो. शहा म्हणाले, 'प्रथम आपल्या देशातल्या लोकांची मानवी मूल्यांची जपणूक करायची, आदर करायची प्रवृत्ती वाढवायला हवी. मानवी हक्कांबाबत त्यांना जागृत करायला हवे. मगच आपली या प्रश्नाबाबत बोलण्याची ताकद वाढणार आहे आणि तीच त्यांना मोठी मदत करू शकेल!'

प्रो. अग्रवाल यांनी या प्रश्नाबाबतची कायदेशीर बाजू काय आहे ती समजावून सांगितली. 'मानवी हक्कांची पायमल्ली होत असेल तर तिसऱ्या राष्ट्राने त्यात हस्तक्षेप करणे योग्यच ठरते, असा आंतरराष्ट्रीय संकेत आहे. तसेच जर जागतिक शांतता धोक्यात येत असेल तर युनोलाही ह्या प्रश्नात पुढाकार घेता येईल; पण संपूर्ण पाश्चिमात्य राष्ट्रगट दक्षिण आफ्रिकेच्या सध्याच्या राज्यकर्त्यांच्या मागे असल्याने युनोलाही फारसे प्रभावी निर्णय घेता येत नाहीत.'

"सर्व आफ्रिकी राष्ट्रांत एकवाक्यता नसल्याने आर्थिक किंवा व्यापारी नाकेबंदी करणेही अशक्य आहे. एकंदरीत दक्षिण आफ्रिकेचा प्रश्न बराच गुंतागुंतीचा आहे."

परिसंवादात आयत्या वेळी प्रा. भिडे आणि प्रो. शिरसीकर यांनीही भाग घेतला. "आमचे विद्यार्थी काय करू इच्छित आहेत?" असा प्रश्न श्री. भिडे यांनी उपस्थितांपुढे काढला.

श्री' डेव्हिड यांनी आभार मानायच्या आधी परिसंवादातील प्रमुख वक्ते व निरनिराळ्या देशांत भारताचे राजदूत म्हणून वावरलेले बॅ. अप्पासाहेब पंत बोलायला उभे राहिले. बॅ. अप्पासाहेब पंतांचा आफ्रिकेतील प्रश्नांशी जवळचा संबंध आहे. कारण ते तेथे राजदूत म्हणून वावरले आहेत, त्यामुळे तिथल्या राजकीय प्रश्नांची त्यांना अधिक माहिती आहे.


आपल्या भाषणात बॅ. पंत म्हणाले, 'राजकारण हा बुद्धिबळाचा खेळ आहे. अमेरिका आणि रशिया ही दोन बडी राष्ट्रे जागतिक पटावर इतर प्रगतिशील राष्ट्रांची यादी पुढे-मागे करत असतात. निरनिराळ्या स्थळांवरचा आणि याद्यांवरचा आपला ताबा त्यांना सोडायचा नसतो. दक्षिण आफ्रिका हे असेच एक प्यादे आहे. तिथे ते आता संपत्तीचा आणि सत्तेचा उपभोग घेत आहेत. ते आपली पकड अशी सहजासहजी सुटू देणार नाहीत. येथे लोकांच्या भावनांचा विचार केला जात नाही, तर व्यवहारावर सगळे राजकारण चालते. त्यासाठी मानवी हक्कही पायदळी तुडवले जातात!'

बॅ. पंत पुढे म्हणाले, 'ही लढाई फक्त दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांपुरती मर्यादित नाही, तर साऱ्याच शोषण, पिळवणूक करणाऱ्यांविरुद्ध ती आहे. मोठ्या शक्ती नेहमीच द्वेषाचे राजकारण फैलावत असतात; पण त्याविरुद्ध आवाज उठवून लढा चालवायला हवा. आसपासच्या देशांतून त्यांना मदत करायला हवी. नुसत्या युनोच्या ठरावांनी काही होणार नाही! प्रत्यक्ष सहभाग आवश्यक आहे!"

दक्षिण आफ्रिकेत वर्णद्वेषाचा लढा जोमाने चालू आहे. परिसंवादात साऱ्यांनीच काही तरी कृती करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. पुणे विद्यापीठाने तिथल्या तिथेच एक निर्णय जाहीर केला. तो होता स्कॉलरशिपसंबंधी. कुलगुरु राम ताकवले यांनी जाहीर केले, 'येत्या वर्षापासून दक्षिण आफ्रिकेतील विद्यार्थ्यांसाठी खास चार स्कॉलरशिप्स् ठेवण्यात येतील!"

परिसंवादातून निदान एक तरी पाऊल उचललं गेलं.

—चंद्रशेखर केळकर



लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे ३० । मूल्य : २० रुपये

परराष्ट्रीय घडामोडी । चन्द्रशेखर पुरंदरे

# इराण

## शत्रू बदलले, पण लढाई चालूच

डॉ. शापूर बख्तियार या शहानियोजित पंतप्रधानाने लष्कराच्या पाठिंब्या-अभावी अल्पकाळही राज्य चालविणे अशक्य आहे हे ओळखून राजिनामा दिला आणि इराणच्या सध्याच्या घडामोडीतील एका पर्वाचा अस्त झाला ! एकूण रणधुमाळीच्या काळातच 'माणूस' विशेषांकात व त्या-आधीही या प्रश्नाची सांगोपांग चर्चा झालेली असल्याने केवळ अगदी ताज्या घटनांचा परामर्श घेणे उचित ठरेल.

तेहरान रेडिओच्या वार्तानुसार शांतता दृष्टिपथात नाही. ठिकठिकाणी संप अजून चालूच आहेत. शहाविरोधी प्रमुख दोन शक्ती एकवटल्या होत्या. आयातुल्ला रुहोल्ला खोमेनीच्या मागे धार्मिक शक्ती होती आणि अतिडाव्या व डाव्या शक्तींना एक निश्चित नेता नसल्याने विस्कळित स्वरूपात त्याही अस्तित्वात होत्या. या दोघांचे आपसात जमणे इराणच्या नजीकच्या भवितव्याच्या दृष्टीने फार आवश्यक आहे. सुज्ञपणे शहा गेला यावर समाधान मानून दोन्ही बाजूंनी जरा पडते घेऊन राष्ट्रजीवनावर, म्हणजे ते सुरळित करण्यावर, लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे; परंतु देश नाजूक स्थितीत आहे तेवढ्यातच पोळी भाजून घ्यावी असा कम्युनिस्टांचा (चिरपरिचित) विचार दिसतो; पण त्या मानाने त्यांची ताकद संघटित नाही. या भूमिकेमुळे फक्त विद्यमान गोंधळात भर पडेल. दुसरा महत्त्वाचा धोका असा आहे की, कोणत्याही राष्ट्रीय पेच-प्रसंगाच्या वेळी सामान्य माणूस अंमळ निराळा राहून शक्यतो चटके न बसतील अशी काळजी घेत असतो. अतीच झाले की तो त्यात ओढला जातो आणि मग प्रकर-णाला एकदम निर्णायक कलाटणी मिळते. निवडणुकांमध्ये बहुमत नेहमी Neutral Votes ची असते ती जिकडे आयत्या वेळी फिरतील तिकडे विजय जातो, तशी बहुसंख्य जनता इराणमध्ये आहे आणि जेव्हा परि-स्थिती अगदीच तीव्र झाली तेव्हा तिने शहाविरुद्ध उडी घेतली; पण चिकाटीने दीर्घकाळ लढण्यापेक्षा स्थिर जीवनाकडे परत जाण्याची तिची ओढ आहे. म्हणूनच हा गोंधळ लवकर संपायला हवा. नाही तर नवे राज्यकर्ते सामान्य माणसाची सहानुभूती व संयम गमावतील,

### इस्लामी शक्तीमधील फूट

प्रामुख्याने इस्लामी शक्ती खोमेनीच्या बाजूने उभी आहे; पण त्यातही दुसरा एक आयातुल्ला तिच्या सरळ विरोधात आहे. याचे नाव शरीयत मदारी. जेव्हा इराणमध्ये संघर्ष धुमसत होता, तेव्हा या धूर्त इसमाने कधी आपण खोमेनीचे इराणमधले प्रवक्ते आहोत अशी भूमिका घे, तर कधी शहाला गोंजारून घे, अशी दुटप्पी आणि दुहेरी धोरणे अवलंबिली आणि कातडी शाबूत राखली ! खोमेनी परत येताच त्याने हळूच स्वतःचा निराळा बूट काढला आहे. कौम हे इराणमधले प्रमुख धार्मिक केंद्र आहे, तिथला हा धर्मगुरू. ते शहर हा त्याचा बालेकिल्ला आहे. खोमेनी उर्वरित इराणमध्ये देवत्वाला पोचलेला आहे शिया पंथीयांनुसार 'इमाम' हा देवाचा अधिकृत प्रवक्ता समजला जातो. मुहम्मद पैगंबराआधी चारशे वर्षांपूर्वी बारावा इमाम होऊन गेला. त्याच्यानंतर पृथ्वीतलावर इमाम झाला नाही अशी त्यांची श्रद्धा असते; पण आता 'इमाम-खोमेनी' हा नवा प्रचार अस्तित्वात येत आहे आणि त्याचे धोके उघडच आहेत. उपरिनिर्दिष्ट शरीयत मदारीचा या संकल्प-नेला विरोध असणे स्वाभाविकच आहे.

ही झाली मुस्लिम नेत्यांतील फूट. मार्क्सिस्ट शक्तींचा पगडा प्रामुख्याने तरुण वर्गावर आहे. शस्त्रे आता ठेवा असे आवाहन खोमेनीने वारंवार करूनही अगदी १० फेब्रुवारीपर्यंत इराणच्या अन्तर्भागात शांतता प्रस्थापित होण्याचे चिन्ह नाही. यावरून मार्क्सिस्ट अजूनही शक्य तेवढा प्रतिकार करीत असावेत असे दिसते.

इराणमध्ये जो गदारोळ आता माजला आहे त्यात प्रमुख घटक लष्कर अजूनही आहे. लष्कराच्या शहानिष्ठ चार जनरलसना गोळ्या घालून ठार मारण्यात आल्याने लष्कराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भविष्य समजून चुकले आहे. सरळ शरणागती पत्क-रण्यापेक्षा संरक्षणासाठी शेवटपर्यंत झुंजत राहावे असे धोरण त्यांनी अंगिकारलेले दिसते. शहाने लष्कराला खोमेनीच्या सत्ते-पुढे मान तुकवा असा आदेश दिला तर अजूनही रक्तपात टळेल असे काही पाश्चात्य निरीक्षकांचे मत आहे; पण लष्कर शहाच्या मताप्रमाणे वागेल ही शक्यता कमी आहे. कारण एक तर लष्करातील फक्त वरिष्ठ अधिकाऱ्यांपुरताच प्रामुख्याने हा प्रश्न निगडित आहे. खालचे सैन्य सभ्रमित अवस्थेत असले तरी त्यांनी हिंसाचार बंद केला आहे. एखाद्या तुकडीची तिच्या प्रमुखा-वर असणारी निष्ठा 'जिहाद' पुकारायला भाग पाडीत आहे आणि ते अटळ आहे.

## मेहदी बझर्गन

या साऱ्या परिस्थितीमुळे बझर्गन या खोमेनीनियुक्त पंतप्रधानाचे कितपत चालेल हा प्रश्न उद्‌भवतो. बझर्गनच्या एकूण राजकीय इतिहासावरून खोमेनीने निवड योग्यच केली आहे हे लक्षात येईल.

सत्तर वर्षांचा मेहदी बझर्गन प्रागतिक समाजवादी विचारसरणीचा आहे. त्याचा दोस्त व आधीचा पंतप्रधान डॉ. शापूर. बख्तियारप्रमाणेच त्याचेही शिक्षण फ्रान्समध्येच झालेले आहे. एकोल सेन्त्राल या ठिकाणी त्याचे शिक्षण झाले. त्याचे बहुतेक आयुष्य शहाविरोधातच गेलेले आहे. इराणच्या 'इस्लामिक मार्क्सिस्ट' या गोंधळात टाकणाऱ्या संकल्पनेप्रमाणेच हा 'प्रागतिक समाजवादी' धार्मिकही आहे. दिवसातून पाच वेळा मक्केकडे तोंड करून नमाज पढणे वगैरे धर्मनिष्ठ मुसलमानांप्रमाणे धर्माचरण त्याचेही चालू असते.

१९५१–५३ या डॉ. मुहम्मद मुसादेकच्या काळात तो इराणच्या नॅशनल ऑइल कंपनीचा प्रमुख होता. ही कंपनी प्रथम अँग्लो इराणियन ऑइल कंपनी (AIOC) होती. तिच्यात ब्रिटनचा प्रमुख सहभाग होता. मुसादेकने तिचे राष्ट्रीयीकरण केले आणि ब्रिटनने सूड म्हणून आंतरराष्ट्रीय बाजारपेठच बंद केली. या आणीबाणीच्या काळात बझर्गनने मुसादेकला प्रचंड मदत केली व इराणी जनतेला याची झळ पोचू नये म्हणून बरेच प्रयत्न केले.

१९६१ मध्ये नेहझेत अझर्दी या नावाची स्वतःची पार्टी त्याने स्थापन केली. शहाने याच सुमारास White Revolution ची घोषणा केली. अवैधनिकरीत्या आपली सत्ता बळकट करण्याचा शहाचा हेतू तेव्हाच बझर्गनच्या लक्षात आला आणि लोकांनी वरवरच्या आर्थिक कार्यक्रमाला भूलू नये यासाठी त्याने जोरदार प्रचार सुरू केला. त्याचे बक्षीस त्याला लगेच मिळाले. दहा वर्षांसाठी तुरुंगात त्याची रवानगी झाली; पण पाच वर्षांनंतरच त्याला सोडण्यात आले.

बझर्गनबरोबरचाच दुसरा प्रमुख नेता करीम संजाबी हा नॅशनल फ्रंटचा एके काळचा नेता. नॅशनल फ्रंट ही विरोधकांची आघाडी होती. शापूर बख्तियारही याच आघाडीतला पण शहाला फितूर झाला.

खोमेनीपेक्षासुद्धा या दोन नेत्यांचे महत्त्व इराणच्या दृष्टीने अधिक आहे कारण मार्क्सिस्ट किंवा इस्लामिक असा कोणताच निश्चित शिक्का त्यांच्यावर नाही. त्यामुळे देशाला अगदी जरुरीचे असणारे स्थैर्य ते देऊ शकतील अशी अपेक्षा आहे. युद्धाचा त्वेष अजून न उतरल्याने नजीकचा भविष्यकाळ फारच चमत्कारिक दिसतो.

जर ही मार्क्सिस्ट विरुद्ध इस्लामिक यादवी सुरूच राहिली तर त्याची परिणती अन्नान्नदशा होऊन इराण नष्ट होण्यात होईल. खोमेनीने न्यायसंस्था इस्लामी कायद्यानुसार चालणार असे जाहीर केले आहे. म्हणजे मुल्ला जो निर्णय देईल तो बंधनकारक. लोकांनी उत्साहाच्या भरात हे व असे निर्णय आज जरी मान्य केले असले तरी खऱ्या कसोटीचा काळ आताच आहे. अमेरिकेविरुद्ध वातावरण एवढे तप्त आहे की, कोणीही त्याबाबत काही म्हणू इच्छित नाही. युरोपियन संस्कृतीबद्दलचा तिरस्कार तर शहाच्याविरुद्ध लढणाऱ्यांचे प्रमुख कारण होते. त्यामुळे युरपची भूमिका अजूनही संदिग्ध आहे. तेलाचे तंत्रज्ञान इराण्यांना निश्चित ज्ञात नसल्यामुळे परावलंबित्व किती काळपर्यंत आणि कोणाचे स्वीकारावे लागेल हाही महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण तेलाशिवाय परत धड उभे रहाणे अशक्य आहे आणि त्यासाठी परकीय मदत अपरिहार्य आहे. परत रशियाला इराणपासून दूर ठवण्याचा खोमेनीचा निर्धार आहे.

आणखी एक महत्त्वाची बातमी मध्ये आली होती ती अशी की, शहानिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांसकट सर्वांना माफी देण्यात येणार आहे. ही माफी देणारा अर्थातच खोमेनी; परंतु पाठोपाठच सावाकच्या प्रमुखासकट चार जनरल्सना ठार मारण्याची बातमी आली. सूडाचे राजकारण सध्या इराणला परवडण्यासारखे नाही. कारण विशेषतः लष्करात शहानिष्ठ कोण आणि विरोधी कोण याचा निर्णय करणे बिकट आहे. सरसकट सगळ्यांनाच कापा म्हटले तरी पेच निर्माण होतील.

आर्थिक कार्यक्रम सादर करणे आणि मल्टिनॅशनल्सबाबत, इतर राष्ट्रांना दिलेल्या कर्जाबाबत, अमेरिकेशी ठरलेल्या करारांबाबत, प्रतिदिनी सहा कोटी डॉलर्स आणणाऱ्या काळ्या सोन्याच्या विनियोगाबाबत निश्चित धोरण जाहीर करणे व अंमलात आणायला सुरवात करणे याखेरीज इराण पूर्वपथावर येण्याचा संभव नाही.

'राष्ट्रवादी' या घोषणेवर खोमेनीने धर्मयुद्ध जिंकले; पण 'राष्ट्रवादी' हा बहुअर्थी शब्द झाला. नक्की करणार काय, हे लवकरात लवकर स्पष्ट करणे आवश्यक आहे. हे दिवस अतिशय महत्त्वाचे आहेत. जनतेची सहानुभूती त्यांच्या बाजूने आहे तोच काही तरी करून दाखवणे अपेक्षित आहे. कारण शेवटी लोकमत हे दुधारी शस्त्र आहे! □

प्रसिद्ध झाले

**टॉलस्टॉय – एक माणूस**

लेखिका : सौ. सुमति देवस्थळे

आवृत्ती दुसरी । मूल्य पंचावन्न रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# गॉर्की कॉलनी

लेखक : ए. एस्. मकरेन्को । अनुवाद : मीनाक्षी कोल्हटकर

कथासूत्र :– काही तुरळक झटापटीचे प्रसंग सोडता कॉलनीत हळूहळू शिस्तीचं वातावरण निर्माण व्हायला लागलं होतं; पण आता एक नवीनच उपद्रव सुरू झाला ! कॉलनीमध्ये लहान–मोठ्या चोऱ्या व्हायला लागल्या. शेवटी एका चोरीमध्ये बुरुन सापडला आणि नंतर चोऱ्यांनाही पायबंद बसला; परंतु याच वेळी कॉलनीबाहेर घडणाऱ्या घडामोडींनी वातावरण पुन्हा दूषित होत होतं. खाराकोवच्या मोठ्या रस्त्यावर रोज लूटमार व्हायला लागली. जंगलाची राखण करण्याचंही काम कॉलनीकडे आलं. असंच एका रात्री कारपोविच नावाच्या लाकूडतोड्याला जंगलात बेकायदा लाकूड तोडताना पकडलं आणि या प्रकारांनाही आळा बसला.
या प्रसंगांमधून आणि आजूबाजूच्या विरोधी वातावरणाशी झगडूनच कॉलनीतल्या मुलांनी नीतिमत्तेचे आणि सहजीवनाचे धडे गिरवले आणि गॉर्की कॉलनीचा ती एक अभेद्य भाग बनत गेली.

## प्रकरण सहावे

## आम्ही एक टाकी हस्तगत करतो

आतापर्यंत हळूहळू आम्ही आमची कॉलनी तगवून धरण्याची धडपड करीत होतो. गरिबी, कष्ट, रोगराई, थंडीने गारठणारे पाय, नित्योपयोगी वस्तूंची कमतरता इत्यादी गोष्टी आम्हाला उज्ज्वल भविष्यकाळाची स्वप्ने पहाण्यापासून परावृत्त करू शकल्या नाहीत. आमची एकुलती एक मध्यमवयाची घोडी आणि आमचा मोडकातोडका नांगर घेऊन आम्ही शेती सुरू करणे कठीण होते. तरीही शेती सुरू करण्याची स्वप्ने आम्ही नेहमी रंगवत होतो व आतापर्यंत ती स्वप्ने तशीच राहिली होती. लॅडीकडे बघून, ती नांगर–ओढू शकेल अशी कोणी कल्पनाच करू शकत नव्हतं तर ती उच्चारण्याची गोष्ट तर दूरच राहिली. कारण आमच्या सर्वांप्रमाणे लॅडी पण सदैव अर्धपोटी असे. तिच्यासाठी गवत मिळवीत असू. दाणा-वैरण मिळविणे मोठे मुष्किलीचे काम होते. तिला गाडीला जुंपून चालवणे म्हणजे हे एक महत्कर्म असे. बिचाऱ्या कालिनाचा उजवा हात लॅडीला चालविण्यासाठी चाबूक मारून मारून दुखू लागे. नाही तर ती चालतच नसे.

दुसरे म्हणजे आमची कॉलनीची जमीन शेतीयोग्य नव्हतीच. जवळजवळ ती माती वाळूसारखीच होती व वारा सुटला की ती साऱ्या आवारात उसळू लागे.

आजसुद्धा जुन्या आठवणी काढीत बसलो की मला अजूनही आश्चर्य वाटते की शेती करायचे वेड आमच्या डोक्यात त्या प्रतिकूल परिस्थितीत कसे शिरले असेल? परंतु अर्थात शेतीमुळेच आम्ही आमच्या पायावर उभे राहू शकलो असतो.

त्याचे असे झाले. एक मोठी मजेदार घटना घडली. आम्हाला ओक वृक्षाची लाकडे आणायची मोठी ऑर्डर मिळाली. ओंडके पडलेल्या ठिकाणाहून ती गोळा करून आणावयाची होती. ती जागा आमच्या कॉलनीपासून फारशी दूर नव्हती व आम्ही अजून त्या बाजूला कधी गेलोही नव्हतो.

आमच्या शेजाऱ्यांबरोबर तिकडे जायला आम्ही निघालो. त्यांनी आपल्या गाड्या आम्हाला दिल्या. आम्ही त्या अगदी अपरिचित जागी जाऊन पोचलो. त्या जागी पोचल्यावर कालिना व मी त्या लोकांना लाकडे भरावयाचे काम देऊन त्या जागेची पहाणी करीत फिरावयाचे ठरविले. ओढ्याच्या काठाने आमचे लक्ष, लांबवर पसरलेल्या पॉपलर झाडांच्या राईकडे गेले. आम्ही बर्फ तुडवीत एक छोटीशी राई चढून गेल्यावर टेकडीच्या पलीकडे आम्हाला एक विचित्रच दृश्य दिसले. तिथे जणू काही जिवंतपणाचे लक्षणच नव्हते. आमच्यापुढे सरासरी एक डझन छोट्यामोठ्या इमारती, झोपड्या, घरं वगैरे पडझड झालेल्या स्थितीत दिसल्या. त्या एके काळी झोपड्या असतील; पण दारे, खिडक्या, जिने काहीच नव्हते. मधली झडपे व छपरे मोडून पडली होती व विटांचे ढीग ढासळले होते. त्यांवर बर्फ साठले होते. घोड्यांचे तबेलेही होते. ते सारे पडके होते. त्यांच्या दोन भिंतींखेरीज काही शिल्लक नव्हते. या

सगळ्या उद्ध्वस्त अवस्थेतल्या जागी एक भलीमोठी लोखंडी टाकी चांगल्या स्थितीत असलेली दिसली. इतकी चांगली की तिचा रंग जणू काही नुकताच दिलेला असावा. या सर्व निःस्तब्ध वातावरणात ती टाकी जणू काय जिवंतपणाची खूण दिसत होती.

त्या भल्यामोठ्या आवाराच्या एका बाजूला एक दुमजली इमारत नुसती प्लॅस्टरशिवायच ठेवलेली दिसली. तिच्यात भलीमोठी दालने होती व त्यांचा गिलावा पडून गेलेला होता. खिडक्यांना संगमरवर वापरलेला होता. इमारतीच्यासमोर एक भलामोठा घोड्यांचा तबेला चांगल्या स्थितीत दिसला. त्या पडक्या इमारतीचा जो काही भाग उदा. पटईच्या तुळया, वरची छपरे व एकंदर आकार वगैरे सुस्थितीत होता. त्यावरून वाटत होते की बांधण्यासाठी चांगलं उंची सामान वापरलेलं असावं. त्याचा सांगाडा चांगला भक्कम असावा. जुना झाल्यामुळे पडला नसावा तर मुद्दाम घाव घालून पाडला असावा.

एवढे सगळे पाहून कालिनासाहेब भारावून गेले. बडबडायला लागले, 'वा! काय मस्त आहे हो! नदी, बगीचा, सारंच काही मस्त आहे हा!'

वाडीला नदीने तीन बाजूंनी घेरले होते. असे दृश्य विरळच दिसे. टेकडीच्या बाजूला ती गेली होती. तिथला बगीचा नदीच्या बाजूला उतरता होत गेला होता. वरच्या टप्प्यावर चेरीची झाडे, दुसऱ्या टप्प्यावर सफरचंदाची झाडे व तिसऱ्या टप्प्यावर कसल्या तरी रानटी झुडुपांनी भरलेली होती.

आवाराच्या एका बाजूला एक पाच मजली पवनचक्की होती. त्या पवनचक्कीचे पंखे फिरत होते. चक्कीवर काम करणाऱ्या एका माणसाकडून कळले की, ती सारी वाडी ट्रेपके नावाच्या घराण्याची होती. ती सारी मंडळी सर्व काही सोडून डेनिकीनच्या सैन्याबरोबर पळून गेली होती. नेण्यासारख्या साऱ्या वस्तू शेजारच्या गोवच्यारोन्का खेडातल्या लोकांनी नेल्या होत्या व ती घरं पण हळूहळू जाण्याच्या मार्गावर होती.

ते पाहून कालिनची नेहमीची बडबड सुरू झाली, 'हलकट, मूर्ख लेकाचे! काय दशा करून टाकली आहे या लोकांनी याची! इथलं सामान नेण्याऐवजी इथेच राहून चांगली शेती वगैरे केली असती तर? पण नाही. चांगल्याची नासधूसच करायची. ही मोडतोड कशासाठी? तर ती लाकडं जाळून अन्न शिजविण्यासाठी! कारण त्यांना जळाऊ लाकूड तोडायला नको. मी सांगतो, हे असेच मरतील! क्रांतीचा वगैरे असल्यांच्यावर काही परिणाम नाही व्हायचा. हे असेच आळशी, दळभद्रे रहातील!'

इतक्यात कालिना एका जाणाऱ्या माणसाकडे वळून म्हणाला, 'काय हो, ती वरती टाकी आहे ती नेण्यासाठी कुठे परवानगी काढायची? ती नुसतीच राहिली तर नक्कीच कुजून जाईल!'

'खरं म्हणता तर मला माहीत नाही. पण इथली गावपंचायत या साऱ्याची मालक आहे आता, असं म्हणतात!'

'ठीक आहे.' असं कालिना म्हणाले व आम्ही घराकडे परत फिरलो. आम्ही हळूहळू आमच्या शेजाऱ्यांच्या लाकूड भरलेल्या गाड्यांच्या मागून चालत होतो. रस्ता बराच साफ असून वसंतऋतू जवळ आल्याची जाणीव करून देत होता.

परत येताना कालिनासाहेब ती टाकी कशी मिळवायची व ती मिळाली तर किती छान होईल, ती आणल्यावर आपण ती लाँड्रीच्या वर बसवायची व लाँड्रीत गरम पाण्याची सोय होईल वगैरेचे बेत आखत होते.

दुसऱ्या दिवशी त्या जंगलात जाण्यापूर्वी कालिना माझ्याकडे येऊन मला गळ घालू लागला.

'हे पहा, आपल्याला ती टाकी मिळविण्यासाठी तुम्ही जरा त्या पंचायतीला एक पत्र लिहून द्या ना! त्यांना त्याचा काहीच उपयोग नाही. आपण पाणी गरम करायला ती वापरू या.'

त्यांच्या समाधानासाठी मी त्यांना एक चिठी लिहून दिली. संध्याकाळी कालिना फुसफुसत आला, 'या लोकांना काही व्यवहारज्ञान नाही. सगळ्या गोष्टींचा ते तात्त्विक भूमिकेवरून विचार करतात. आता म्हणे ती राष्ट्रीय संपत्ती. काय पण! असं कधी ऐकलंय तुम्ही? जाऊ दे तुम्ही मला जिल्हाधिकाऱ्याला द्यायला एक चिठ्ठी द्या पाहू!'

'तुम्ही पोचणार कसे तिथे? ते तर इथून दहा मैल दूर आहे. तुम्ही एवढ्या लांब जाणार कसे?'

'असू दे. तिकडे जाणारा एकजण माझ्या माहितीचा आहे. त्याच्याबरोबर मी जाईन.'

पण कालिनासाहेबाची गरम पाण्याची कल्पना सगळ्या कॉलनीच्या डोक्यात भरली होती; पण ती टाकी त्याला मिळेल याबद्दल मात्र सारे साशंकच होते. मी म्हटलं,

'जाऊ दे. बा कालिना, ती आपल्याला नकोच. आपण आपली एक लाकडी बनवू.'

'काय खुळे आहात? अहो, टाकी लोखंडाचीच बनवितात. त्याचा काय उपयोग करायचा आहे हे त्यांना चांगलं माहीत असतं. ती लाकडाची बनवत नाहीत. मी तीच टाकी आणतो. पहा तरी. मी त्यांना द्यायला लावीनच.'

'ती आणणार कशी? लॅंडीला ती पेलवणार नाही.'

'पाहू कशी आणायची ते. इच्छा आहे तिथे मार्ग पण आहे.' पण जिल्हाधिकाऱ्याकडून कालिना संतापूनच आले. त्यांना राग व्यक्त करायला शब्दही आठवेनात जणू.

पुढचा सबंध आठवडा कालिनानं माझ्यामागे आणखी वरच्या वरच्या अधिकाऱ्यांकडे जाण्यासाठी टुमणे लावले. पोरंसुद्धा हसत होती त्याला याबद्दल.

मी शेवटी चिडून म्हटले, 'मला त्रास देऊ नका कालिना. त्या टाकीपेक्षा किती तरी महत्त्वाच्या गोष्टींचा आपल्याला विचार करावयाचा आहे.'

'काय एवढा भाव खाता? नुसती एक चिठ्ठी द्यायची. पुढचं मी करतो सारं. चिठ्ठी लिहायला असा किती वेळ लागतो?' शेवटी मी तिसऱ्यांदा चिठ्ठी लिहून त्याच्या खिशात घातली. कालिका खूष झाले आणि म्हणाले, 'असं काय? एवढी चांगली वस्तू तिथं वाया जाणार आहे आणि कोणी काही करायला तयार नाही. आपण काही आता झारशाहीत रहात नाही.'

संध्याकाळी कालिनासाहेब उशीरा आले; पण माझ्या खोलीत किंवा डॉरमिटरीत फिरकले नाहीत. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत

बेपर्वाईने त्रयस्थासारखे ते माझ्याकडे आले पण नाहीत. आले ते खिडकीतून लांववर बाहेर बसून राहिले.

'काहीच होत नाही.' एवढंच बोलले. कागद माझ्याकडे दिले. त्या आमच्या अर्जाच्या कागदावर एका कोपऱ्यात लाल शाईनं अत्यंत उर्मट भाषेत आम्हाला सर्वस्वी नामोहरम करणारे 'नामंजूर' असे शब्द लिहिलेले होते.

कालिना फारच हताश झालेले दिसले. दोन आठवडे ते फारसे कुणाशी बोलले नाहीत. त्यांचं नेहमीचे मोकळे हसणेही कुणी पाहिले नाही.

मार्च महिन्यात बर्फ वितळू लागले. एका रविवारी मी काही मुलांना बोलावून घेतले. पोरांनी गरम कपडे लपेटून घेतले व फिरत फिरत आम्ही ट्रेपकेवाडीकडे गेलो.

तिथे फिरल्यावर मी मुलांना उद्देशून म्हटले, 'समजा, आपण इथं रहायला आलो तर?'

'या घरातून? ही तर सारी मोडकळीस आलेली आहेत.'

'आपण ती दुरुस्त करू.'

झादारोव मोठ्यांदा हसला व म्हणाला, 'आपल्या जुन्या वाडीतली तीन घरे अजून दुरुस्त व्हायची आहेत. ती आपण गेल्या हिवाळ्यात दुरुस्त करू शकलो नाही; पण समजा, ही जागा जर आपणाला दुरुस्त करून मिळणार असेल तर फारच छान. बगीचा, नदी आणि ही चक्की सारंच काही इथं आहे.' आम्ही त्या घरावरातून हिंडू लागलो. इथे स्वयंपाकघर, इथे जेवणघर, तिथे झोपायची जागा, तिथे शाळेला जागा वगैरे वगैरे करून घेऊ असे बेत केले.

आम्ही घरी परत आलो ते दमूनच; पण आम्हाला कमालीचा नवा उत्साह वाटत होता. आमच्या डॉरमिटरीत नव्या वाडीत जाण्याबद्दल जोरजोरात चर्चा झाली.

एके दिवशी एकातेरीना म्हणाली, 'हे पहा, अशी दिवास्वप्नं पहात बसणे हे काही बोल्शेविकाचे लक्षण नव्हे.' सारी पोरे चूप झाली एकदम. मी तिच्याकडे रागाने पहात माझी मूठ जोरात आपटून म्हटले, 'एक महिन्याच्या आत ती वाडी मी आपल्याला मिळवून दाखवीनच. हा तरी बोल्शेविकांचा मार्ग आहे की नाही?' सारी पोरे मनापासून हसली. मी व एकातेरीनाही त्यात सामील झालो.

सबंध रात्रभर बसून स्थानिक कमिटीला सादर करण्यासाठी मी रिपोर्ट तयार केला व पाठवून दिला.

एका आठवड्यानं त्या स्थानिक अधिकाऱ्यांनी मला बोलावून घेतलं व सांगितलं की, आम्ही ती वाडी पाहून येतो.

आणखी एक आठवडा असाच गेला. ते कमिटीचे लोक विचार-विनिमय करतच होते. त्यांनाही या ट्रेपकेवाडीचे काय करावे हे समजेना. आमच्या कॉलनीची दयनीय परिस्थिती मी त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न केला व अशा त्या जागी खरीखुरी सामुदायिक राहाणीची ईर्षा निर्माण होणे अशक्य आहे हेही सांगितले.

त्या कमिटीचे अध्यक्ष म्हणाले, 'पहा, इथं जागा आहे, वाव आहे व माणसंही काम करायला तयार आहेत. देऊन टाकू या त्यांना.' शेवटी ती जागा ताब्यात घ्यायचा हुकूम माझ्या हातात पडला.

'साठ एकर जमीन व दुरुस्तासाठी मंजुरी.' असे त्यात लिहिलेलं होतं. मी तो हुकमाचा कागद घेऊन डॉरमिटरीत उभा होतो. हे सत्य आहे का स्वप्न आहे? सारी मुले उत्सुकतेने माझ्या हातातल्या कागदाकडे पहात होती. जणू एकदम उत्साहाची वावटळ उठली. वर केलेल्या हातांचे एक रानच जणू उठले, 'आन्तोन, दाखवा ना आम्हाला तो हुकूम.'

एकातेरीना पण तिथे आली. मुले तिच्याकडे धावली. शेल्यापुतीनचा कर्कश आवाज डॉरमिटरीत घुमला,

'काय बाई, आता तरी बोल्शेविक मार्ग चोखाळला हे कबूल कराल ना?'

'काय झालं? कसला बोल्शेविक मार्ग?' असं म्हणत कालिना पण तिथे आला. त्याचा आनंद ओसंडून जात होता. तो म्हणाला, 'तू पण वल्ली आहेस हं! बायबलमध्ये सांगितल्याप्रमाणे माग आणि ते मिळेल, दार ठोठाव व ते उघडेल आणि तुम्हाला मिळतं. मागाल ते ते......'

झादारोव म्हणाला, 'काय मिळतं? एक ठोसा.'

कालिना बोलला, 'ठोसा नाही बेटचा, हुकूम मिळाला हुकूम'

'पण कालिनासाहेब, तुम्ही पाण्याची टाकी मागितली आणि तुम्हाला खरोखरच ठोसा मिळाला की नाही? हे खरं महत्त्वाचं राष्ट्रीय काम झालं. आणि आपलं काही तरी मागितलं असं नव्हे.' झादारोव बोलला.

कालिना म्हणाला, 'तू अजून बच्चा आहेस रे शास्त्राचा अर्थ सांगायला.'

दुसऱ्याच दिवशी रविवारी मी व कालिना काही मुलांबरोबर नवी वाडी पहायला गेलो. कालिना जोरजोरात पाइपचे झुरके घेत होता. त्या टाकीजवळून जाताना त्यांना विशेष अभिमान वाटला.

बुरुनने खवचटपणे विचारले, 'बरं, ही टाकी हालवायची कधी?' कालिना म्हणाले, 'आता कशाला ती हालवायची? आता इथंच त्याचा योग्य उपयोग करू.' विषयांतर करण्यासाठी ते म्हणाले,

'काय बांधकाम आहे पहा!'

□

## प्रकरण सातवे

# प्रत्येकजण काही तरी करू शकतो

ट्रेपकेवाडी खरोखरी मिळाल्याचा आनंद आम्हाला कृतीत उतरवायला लवकर मिळेल असे दिसेना. कारण वाडी राहाण्यायोग्य व दुरुस्त करायला पैसा व सामान, या ना त्या कारणाने मिळायला खूप दिवस लागले; पण मुख्य अडचण होती ती अशी की, कोलोमॅक नावाची छोटीशी नदी आमची सध्याची कॉलनी व ट्रेपकेवाडी यामधून वाहत जात होती. एप्रिल महिन्यात तिला खूप पाणी आले. जणू काही आपले खरे स्वरूपच तिने दाखवायचे ठरवले होते. अगदी दोन्ही काठांवर खट्याळपणाने ते पसरले. नंतर हळूहळू कमी झाले व ती आपल्या मूळच्या जागी स्थिर झाली; पण त्या राहिलेल्या पाण्याने

चिक्कार चिखल झाला व माणसांनाच काय पण घोड्यांनासुद्धा तिथून जाणे मुष्किलीचे झाले.

त्यामुळे ट्रेपकेवाडी—आमची नव्या वसाहतीची जागा असे म्हणत होतो ती—बराच काळ तशीच पडून राहिली. मुले वसंतऋतु येण्याची वाट पहात राहिली. सकाळी न्याहारी झाली की, कामाची घंटा होईपर्यंत ती उन्हात येऊन पाठी उघड्या टाकून उन्हे खात बसत, कधी छातीवर ऊन घेत, साऱ्या मैदानात जाकिटे पसरून ठेवीत. त्यांना सांगितले नसते तर तशीच किती तरी वेळ ती ऊन खात बसली असती. बिचाऱ्यांना ऐन थंडीत डॉरमिटरीतसुद्धा ऊब मिळाली नव्हती.

घंटी वाजली की मोठ्या मिनतवारीने ती ठरलेल्या जागी कामाला जात; पण अधूनमधून काही तरी कारण काढून उघड्यावर ऊन खायची संधी ते सोडीत नसत.

एप्रिलच्या सुरुवातीला वास्का पोलेस्चुक नावाचा मुलगा कॉलनीतून पळून गेला. तो काही तसा पहिल्यापासून आमच्या कॉलनीत नव्हताच. मागच्या डिसेंबरात मी पब्लिक एज्युकेशन डिपार्टमेंटमध्ये गेलो होतो. तिथे तो मला दिसला. तो अगदी घाणेरड्या अवस्थेत होता व त्याच्याभोवती लोक गोळा झालेले होते. मंदबुद्धी मुलांसाठी काम करणाऱ्या खात्याने त्याला मदबुद्धीचा म्हणून ठरविले होते आणि ते त्याला मंदबुद्धी मुलांसाठी असणाऱ्या खास शाळेत पाठविणार होते. तो बिचारा रडत होता. मी वेडा नाही असे सांगत होता. त्यांनी त्याला शहरातून कसाबसा पकडून आणला होता व त्याला सांगितले होते की, 'तुला कासनोदारच्या शाळेत पाठवू !'

'तू रडतोस कशाला ?' असे मी त्याला विचारले.

तो सांगू लागला, 'हे लोक मला वेडा म्हणतात !'

'ते सारं मी ऐकलंय ! तुझं ओरडणं बंद कर व माझ्याबरोबर चल !' मी त्याला सांगितले.

'आपण कसं जायचं ?'

'आपल्या पायांनी चल ! चालू लाग !'

मुलाच्या चेहऱ्यावर हुशारीचे जराही लक्षण दिसले नव्हते; पण तसा तो दुबळाही दिसत नव्हता. मी विचार केला, 'प्रत्येकजण काही तरी करू शकतो.'

मंदबुद्धी लोकांच्या शिक्षणखात्याच्या लोकांना त्या पोराची ब्याद टळली म्हणून फार बरे वाटले. मग चालत चालत आम्ही कॉलनीकडे निघालो. येताना वाटेत त्या पोराने आपली ठराविक साच्याची हकीगत सांगितली. साधारणतः ती नेहमीप्रमाणेच होती—आपले आई-बाप मेले. नाव वास्का पोलेस्चुक व आपण दरिद्री होतो. उपासमारीमुळे आपण कसे उद्योग केले व म्हणून पकडलो गेलो वगैरे. एका ठिकाणी धाड घालायला पण कमी केले नव्हते त्याने !

पहिल्या दिवशी वास्का अगदी गप्प राहिला. शिक्षक किंवा मुले यांपैकी कोणालाही त्याच्याकडून एक अक्षरही ऐकायला मिळाले नाही. त्याच्या या मुक्याच्या व्रतामुळेच मला वाटते, शिक्षणखात्यात त्याला अर्धवट व मंदबुद्धी ठरवला असावा.

त्याच्या अबोलपणामुळे मुलांना जरा विचित्र वाटले व 'त्याला बोलका करण्यासाठी आपण आपले उपाय करू या. म्हणजे त्याला चांगलाच घाबरवायचा. मग तो चांगला बोलायला लागेल,' असे मुलांनी मला सांगितले. मी ते सरळ नामंजूर केले. आता मलाही त्याला कॉलनीत आणल्याबद्दल पश्चात्ताप होऊ लागला होता.

एके दिवशी पोलेस्चुक कोणतेही बाह्य उपचार करावे न लागता आपोआप एकदम बोलू लागला. कदाचित हा वसंतऋतूचा परिणाम नव्हता ना ? सगळीकडे वातावरण मातीच्या मंद वासाने दरवळून गेले होते. तो अगदी सारखा उत्साहाने बोलत होता. बोलता बोलता मध्येच खूप जोरात हसे व एकदम उडी मारी. सतत माझ्याभोवती घोटाळत राही व 'रेड आर्मीत असे होते, रेड आर्मीत तसे होते, झुबाटा नावाचा अधिकारी असा होता,' अशी सारखी बडबड करीत राही.

झुबाटा काय मस्त माणूस होता ! त्याचे काळेनिळे मोठाले डोळे कोणावर रोखले तर तो थंडगारच होई ! आपली माणसेच त्याला खूप घाबरत असत.

मुले त्याला विचारीत, 'काय रे, झुबाटा असा होता आणि तसा होता म्हणून सांगतोस, त्याचा पत्ता तरी तुला माहीत आहे का ?'

'पत्ता म्हणजे काय बुवा ?' तो विचारी.

'अरे, तू त्याला पत्र लिहू शकतोस का ?' असे विचारता तो म्हणे, 'छे, छे. पत्र कशाला लिहायचं ? मी निकोलायेनला जाईन आणि मला तो तिथे नक्कीच भेटेल.'

'तो तुला परत पाठवील.' मुले त्याला चिडवत.

'कधीच पाठविणार नाही' तो उलट म्हणे, 'आपणच स्वत: काय म्हणून त्याला त्रास द्यायचा ? मी काही वेडगळ नाही. काय ? आहे मी वेडगळ ?'

अशा तऱ्हेने वास्का त्या आम्ही न पाहिलेल्या झुबाटाबद्दल तो कसा दिसतो, तो कसा बोलतो, तो कसा हुषार आहे, त्याने कधीही वाईट भाषा वापरली नाही वगैरे घोळून घोळून सांगे. मुलांनी शेवटी विचारले,

'काय रे, तू पळून तर जाणार नाहीस ?'

यावर तो विचारात पडे व माझ्याकडे कटाक्ष टाकून गप्प होई. त्याने खूप विचार केला असावा. बाकी सारे जण त्याच्या पळून जाण्याबद्दल विसरून गेले व दुसऱ्या काही कामात मग्न झाले की त्यातल्या एखाद्या मुलाला तो विचारी, 'समज, मी पळालो तर आन्तोन रागावतील का ?'

त्या पोराने सांगितले की, 'नक्कीच रागावतील. तुझ्यासाठी त्यांनी एवढे कष्ट घेतले आहेत.'

यावर वास्का एकदम गप्प होई.

अखेर एके दिवशी सकाळची न्याहारी संपवून ओरडतच शेलापुटीन माझ्याकडे आला,

'आन्तोन, वास्का कॉलनीत कुठेही नाही. त्याने न्याहारीसुद्धा केली नाही. तो अखेर पळालाच. बहुधा त्या झुबाटाकडे गेला असावा.'

मुले माझ्याभोवती जमली होती. वास्काच्या पळण्याचा माझ्यावर काय परिणाम होतोय हे बहुधा ती अजमावीत असावीत.

'क्रिमियालाच गेला असावा किंवा निकोलाएवलाच गेला असावा. आपण स्टेशनवर गेलो तर कदाचित आपण त्याला पकडू शकू.' असे मुलांचे आपापसात बोलणे चालले होते.

वास्काला पळून जाण्यामुळे काही जास्त चांगले मिळणार नसले

तरीही हे कबूल केले पाहिजे की आमच्या या दरिद्री राहाणीचा अव्हेर करणारा कोणी तरी निघालाच.

मी माझ्या मनाशीच विचार करीत होतो. आमच्या निकृष्ट राहाणीमुळे खरेच कुणाला इथे रहावेसे वाटणार नाही हे मला पटत होते व तो चांगले काही तरी मिळेल या आशेने गेला असावा.

पण मी मुलांना मात्र सांगितले, 'जाऊ दे. गेला तर गेला. आपल्याला विचार करण्यासारख्या इतर पुष्कळ गोष्टी आहेत.'

एका अनपेक्षित घडामोडीमुळे कालिनाला आपण शेती करावी असे वाटू लागले. तो एप्रिलचा महिना होता. प्रसंग असा की, उन्मार्गी मुलांसाठी नेमलेल्या कमिशनसमोर एका चोरी केलेल्या मुलाला आणण्यात आले. त्या मुलाने एक घोडा चोरला होता. मुलाला कुठे तरी पाठविण्यात आले; पण घोड्याचे काय करायचे असा त्यांना प्रश्न पडला. एक आठवडा त्यांनी विचारात घालवला. कालिना अचानक कमिशनकडे गेला. त्या निरपराध मुक्या जनावराचे हाल पाहून त्याला वाईट वाटले. कालिना काही कामासाठी शहरात गेला होता. त्याने तो घोडा पाहिला व सरळ धरून कॉलनीत आणला. कमिशनच्या लोकांनी हरकत तर घेतली नाहीच; पण त्यांना हायसे वाटले.

कालिना घोड्याला घेऊन कॉलनीकडे येताना मुलांनी पाहिले व आनंदाने व आश्चर्याने ते नाचायला लागले. कालिनाने घोड्याचा लगाम गुडच्या हाती दिला आणि बजावले, 'याची नीट काळजी घ्या. कारण ते मुकं जनावर आहे. त्याला तक्रार करता येणार नाही. तुम्ही आपापसात धुसमुसळेपणा करता तसा करू नका. जर तुम्ही त्याची खोडी काढायचा प्रयत्न केलात आणि त्याने लाथा मारल्या तर आन्तोनकडे रडत-ओरडत येऊ नका. त्याचा काही उपयोग होणार नाही. उलट मीच तुम्हाला चांगली शिक्षा करीन.'

आम्ही सारे कॉलनीभोवती जमलो. कालिनांच्या बोलण्यावर कोणी आक्षेप घेतला नाही. कालिना खुषीत येऊन पाईपचे जोरजोरात झुरके घेत होता.

घोडा खरोखर धष्टपुष्ट व उमदा होता.

कालिना व काही मुलांनी मिळून कित्येक दिवस साऱ्या शेडमध्ये धुंडाळून हातोडी, स्क्रूड्रायव्हर व लोखंडाचे तुकडे वगैरे सामान इकडून तिकडून गोळा केले व कसाबसा एक नांगर तयार केला.

एका सुमुहूर्तावर बुरुन व झादारावने जमीन नांगरायला सुरवात केली.

कालिना तिथेच बाजूला उभा राहून, 'असं करा, असं करू नका' वगैरे सूचना देत होता.

शेवटी पोरे कालिनाला चिडवीत म्हणाली, 'तुम्ही स्वतः कधी नांगर धरलाय का? एक वावभर तरी जमीन नांगरली आहे का? दाखवा पाहू आम्हाला कसा चालवायचा तो.'

यावर कालिना चिडून म्हणाला, 'मी नांगर कधीच चालवला नाही; पण तुम्ही कुठे चुकता ते मी नक्कीच सांगू शकतो. तेच नेमकं तुम्हाला समजत नाही.'

गुड व व्रावचिन्को चाललेली नांगरणी एकाग्रतेने पहात होते. मुख्यतः घोड्यांना त्रास होऊ नये या हेतूने ते पहात होते व्रावचिन्कोने नव्या घोड्याचे नाव रेड ठेवले होते. त्याचा तो फार काळजी घेत होता. गुडच्या हाताखाली घोड्याची चाकरी करायचे काम त्याने स्वखुषीने पत्करले होते.

सोफ्रोन गोलोवान नावाचा एक लोहार जवळच रहात असे. त्याच्या अंगच्या काही गुणांमुळे तो इतरांपेक्षा वेगळा होता. तो भलताच तगडा होता. थोडा धुंदीत असायचा; पण तसा खूप प्यालेला नसे. प्रत्येक गोष्टीबद्दल त्याची स्वतःची मते होती. ती खरोखर मूर्खासारखी होती. सोफ्रोनमध्ये लोहार व मध्यम शेतकरी यांचे जणू मिश्रण होते. त्याच्या स्वतःच्या मालकीची दोन झोपडी, तीन घोडे, दोन गायी व एक लोहाराची भट्टी होती. तो उत्तम लोहार होता व त्याच्या डोक्यापेक्षा त्याचे हात नीट ठिकाणावर असत. त्याची भट्टी मोठ्या रस्त्यालगतच होती. त्या मोक्याच्या जागेमुळे त्याला खूप काम मिळे व त्यामुळे तो एवढी माया जमा करू शकला होता. सोफ्रोनच्या मदतीने आमच्या मुलांनी आमचे बियाणाचे अवजार कसेबसे दुरुस्त करून घेतले होते.

गोलोवान कालिनाच्या बोलावण्यावरून एक दिवस कॉलनीत आला. आमचे लोहारखाते तसे बेताबाताचेच होते. कुठून तरी थोडीबहुत अवजारे आम्ही जमा केली होती. सोफ्रोनने स्वखुषीने स्वतःची ऐरण व भाता, थोडीशी हत्यारे आणायचे ठरविले. तसेच त्याने लोहाराचे तांत्रिक शिक्षण आमच्या मुलांना देण्याचे कबूल केले. इतकेच काय तर आमचे सबंध लोहारखातेही दुरुस्त करून देण्याची त्याने तयारी दाखविली. गोलोवानने स्वखुषीने आम्हाला एवढी मदत करायची तयारी का दाखवावी याचे मला थोडे आश्चर्यच वाटले; पण मला फार काळ थांबावे लागले नाही. एके दिवशी रात्री गप्पा मारताना कालिना म्हणाले की,

'गोलोवान आपल्या कॉलनीत आपल्या मुलांना लोहाराचे शिक्षण द्यायला तयार आहे. कारण हे आजुबाजूचे लोक त्याच्यावर टपले आहेत. त्याची ती सारी सपत्ती ते एक दिवस पळवतील अशी त्याला भीती वाटते. तो इथे येऊन राहिला की, तो आपल्या कॉलनीला व पर्यायाने सोविएत राज्याला मदत करतो असेही त्याला भासविता येईल.'

'काय करावं मग आपण?' मला विचार पडला.

कालिना परत म्हणाला, 'मला वाटते त्याला त्याची भट्टी चालवायला आपण परवानगी देऊ या. नाही तर कुठ आपण सध्या या कामाला शिक्षक नेमू शकतो? आपल्याला ऐरण व भाता कुठून मिळणार? एखादी झोपडी दुरुस्त करायची तरी आपल्याला सुतार बोलवावा लागतो आणि तो कुलक (सुखवस्तू) असला तरी काय बिघडले? आपण त्याला सर्वसामान्य माणसासारखाच वागवू!' आपल्या पाइपमधून धुराचे भपकारे सोडीत कालिना हसून एकदम म्हणाला,

'हे मुझिक त्यांची भट्टी खरोखरच एखादे दिवशी मोडतील आणि त्यात कुणाचाच फायदा नाही. तीच आपण इथे आणली तर ती चालू राहील. नाही तरी ती तशीच पडून राहणार आहे. सोफ्रोनला जे काम बाहेर मिळत होते ते तो इथे आणून करील. आपल्याला आपले काम होईपर्यंत त्याला ठेवून घेऊ. त्याला सांगू, 'हे बघ, ही सोविएतची संस्था आहे आणि तू आहेस जुन्या जमान्यातला नफेखोर; पण तुझ्या गमजा इथे काही चालायच्या नाहीत

वगैरे वगैरे ! ......'

अलीकडेच आम्हाला ट्रेयकेवाडी दुरुस्त करण्यासाठी पैसे मिळाले. अर्थात ते फारच थोडे होते. इतके थोडे होते की, सारे काही आमचे आम्हालाच करून घ्यायला पाहिजे होते आणि त्यासाठी आम्हाला लोहाराची भट्टी व सुताराची पण जरुरी होतीच. आम्ही थोडी हत्यारे विकत आणली व लवकरच आम्हाला एक सुतार शिक्षक मिळाला. काय करावे हे ठरविणे कठीण होते; पण त्याच्या देखरेखी-खाली आमच्या कामाला सुरुवात झाली. मुले अगदी जोरात लाकूड कापण्याच्या व तासण्याच्या कामाला लागली. नव्या कॉलनीत बसवायची दारे, खिडक्या बनवायला सुरुवात झाली. दुर्दैवाने आमच्या सुताराचे ज्ञान तसे अगाधच होते. त्यामुळे दारे-खिडक्यांची मापे घेऊन ते बनविणे मोठे कठीण होऊन बसले. मात्र भट्टी उत्तम नसली तरी तितकीशी अगदी वाईट स्थितीत नव्हती. सोफ्रोनला सोविएत सरकारची पुनर्रचनेची गती काही थांबविण्याची घाई नव्हती. आम्ही त्याला फारसा पगार देत नव्हतो; पण तो साराच्या सारा पगार एका मुलाबरोबर शेजारच्या गावातल्या एका हातभट्टी-वाल्याकडे पाठवी व तीन बाटल्या हातभट्टीची दारू आणवी.

मला तोपर्यंत फारशी कल्पना नव्हती. मी निरनिराळे नवे शब्द, उदा० बिजागर, कडचाकोयंडे वगैरे शब्द ऐकून हरखून जात असे. माझ्याइतकीच मुलेही या आमच्या कामाच्या पसाऱ्यामुळे चक्रावून गेली होती. त्यांच्यात खरोखरीच इतके दिवस सुप्त असलेले सुतार व लोहार जागे होऊ लागले. आमचा छोटेखानी कारखाना जोरात सुरू झाला होता आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे आम्हाला त्यापासून थोडे थोडे उत्पन्नही मिळू लागले होते.

त्या लोहाराच्या भट्टीने आमच्या कॉलनीत एक नवेच चैतन्य जणू निर्माण केले. सकाळी आठ वाजले की, त्या ऐरणीचा आवाज साऱ्या कॉलनीभर घुमे. उघड्या दारातून हसण्याचे व बोलण्याचे आवाज ऐकू येत. दोन-तीन गाववाले सदैव काही ना काही निमित्ताने तिथे दिसत आणि त्यांची आपसात पीक-पाणी, खत, नवे कर व सरपंच वगैरेबद्दल चर्चा चाले. आम्ही गाववाल्यांच्या घोड्यांना नालबंद करीत असू. त्यांच्या चाकांना धावा बसविण्याचे व नांगर, औत वगैरे दुरुस्त करण्याचे काम पण करीत होतो. गरीब लोकांकडून कमी व सुस्थितीतल्या लोकांकडून जास्त पैसे घेत होतो. यामुळे न्याय, अन्याय व पिळवणूक यावर चर्चा चाले.

सोफ्रानने एक छोटासा छकडा करून द्यायचे कबूल केले. त्यासाठी जुन्या सामानातून एक सांगाडा शोधून काढला. कालिनाने शहरातून दान आस विकत आणले. दोन दिवस ठोकून ठोकून ते तयार झाले. फक्त त्याला चाके व स्प्रिंग्ज् पाहिजे होत्या. मी बाजारात जुन्या स्प्रिंगचे चाक शोधण्याची खूप धडपड केली; पण व्यर्थ ! शेवटी कालिना या कामगिरीवर गेला. एक सबंध आठवडाभर तो परतला नाही. त्यानंतर उत्तम कांच्या चाकांची रीम वगैरे घेऊन आला व बरोबर नवीन कल्पना पण.

एक दिवस सोफ्राने कोझीर नावाच्या माणसाला घेऊन आला. तो तिथेच रहाणारा होता. तो एक शांत, सुस्वभावी आणि सदा हसतमुख असायचा; पण ऋसाचो खूण करायची त्याला सवय होती. तो नुकताच वेड्याच्या इस्पितळातून सुटलेला होता व त्याच्या बायकोचे नाव काढताच तो भीतीने कापू लागे. कारण त्या बयेमुळेच त्या बिचाऱ्याला वेड्याच्या इस्पितळात भरती व्हावे लागले होते. कोझीर चाके छान बनवी. विशेषतः त्याला आम्ही चाके बनवायला सांगितली तेव्हा तो फार आनंदित झाला. कामाचा त्याला जराही कंटाळा येत नसे. त्याच्या घरच्या चमत्कारिक परिस्थितीमुळे त्याला एकट्याला आयुष्य काढावे लागत होते. त्याने एक दिवस धीर करून आम्हाला विचारले,

'तुम्ही मला कामासाठी बोलावलंत, तेव्हा मी इथंच राहू का ?'

'आमच्याकडे सोयिस्कर जागा नाही !' असं आम्ही त्याला सांगितले.

त्यावर तो म्हणाला, 'त्याची तुम्ही काळजी करू नका. मी मला जागा शोधून घेईन. देव मला मदत करील. सध्या तर उन्हाळा आहे. मी बाहेरच झोपेन. हिवाळा सुरू झाला की मी त्या मांडवात झोपेन. मी तिथे व्यवस्थित राहीन !'

शेवटी कोझीरला रहायला परवानगी दिली व तो येऊन राहू लागला. तो रहायला आल्यावर त्याने आमच्या एका निकडीच्या प्रश्नाला हात घातला. 'आपण तारा आणवू. कालिनासाहेबांना त्या आणाव्या लागणार नाहीत; पण त्या कशा आणायच्या हे मला चांगलं माहीत आहे. शेतकरी लोक ती रीम घेऊन आपणाकडे येतील. परमेश्वर आपल्याला मदत केल्याशिवाय रहाणार नाही. आपण सुंदर चाकं बनवू !'

आम्हाला चाकांची जरुरी नव्हती म्हणून आम्ही त्याला तसे सांगितले; पण तो पक्का व्यवहारी होता. तो म्हणाला, 'शेतकऱ्यांना त्यांची सदैव जरुरी असतेच व आपली मुलं बनवतील. आपण ते विकून पैसे मिळवू.'

कालिनाला त्याचे म्हणणे तत्काळ पटले. 'त्याला इथं राहू द्या ! निसर्ग असा मजेदार आहे की, प्रत्येक माणसाचा काही तरी उपयोग व्हावा अशी त्याची योजना असते !' कोझीर कॉलनीत साऱ्यांचा आवडता झाला. डॉरमिटरीजवळच्या खोलीत तो राहू लागला. आता मात्र तो त्याच्या बायकोपासून अगदी सुरक्षित होता. त्याची बायको आली की, तिला पळवून लावायची हा मुलांच्या आवडीचा एक कार्यक्रम होता. ती बाई केव्हाही येऊन थडके व आरडाओरडा करीतच येई, 'माझ्या नवऱ्याला मुकाट्यानं परत पाठवा !' म्हणून मागणी करी. ती मला, मुलांना आणि सोविएत सरकारला शिव्या घाली. सोफ्रोनवर तिचा जास्तच राग. 'त्याच्यामुळेच माझ्या संसाराचं वाटोळं झालं !' असं ती म्हणे. मुले कोणताही आडपडदा न ठेवता तिला सरळ सांगत की, 'कोझीर चाकं बनविण्यात खरो-खरच तरबेज आहे व ते जास्त महत्त्वाचं आहे !'

अशा वेळी कोझीर आपल्या खोलीत मुटकुळे करून बसे. त्या बयेचा आवाज लांबवर जाईपर्यंत तो बाहेरच येत नसे. ती गेली की तो सुटकेचा निश्वास टाकी व म्हणे, 'काय पण घडवलंय देवानं या बयेला !'

कोझीर आपल्या कामात वाकबगार होता. चाके बनविण्याचा धंदा तेजीत चालू लागला व आम्हाला पैसे पण मिळू लागले. कोझीरच्या कामाची खूप दूरवर प्रसिद्धी झाली होती. अशा तऱ्हेने आमचे काम वाढत होते. आमचे आयुष्य गुंतागुंतीचे व त्याच वेळी

आशादायक बनत होते.

कालिनाने शेवटी खरोखरच पाच बिघा जमिनीत ओटचे पीक लावले. रेड घोड्याने आमच्या पागेत भर टाकली. शिवाय आमच्या आवारात छकडा आला. तो जरुरीपेक्षा जरा जास्त उंच झाला होता एवढेच. जमिनीपासून सात फूट उंच असल्याने आत बसलेल्या माणसाला घोडा नक्की जोडलेला आहे की नाही हे बरोबर दिसत नसे. लांबवर कुठे तरी असल्याचा भास होई.

आमची कामे एवढी वाढली की, आम्हाला कामाला माणसेच कमी पडू लागली. आम्ही कशीबशी आणखी एक डॉरमिटरी दुरुस्त केली आणि खरोखरच आणखी नवीन चेहऱ्यांची भर पडली. ही नवी मंडळी जरा वेगळ्याच धाटणीची होती.

एव्हाना दरोडेखोरांना बराच पायबंद बसला होता. त्या दरोडेखोरांच्या टोळीत स्वयंपाक करणारी किंवा वरकाम करणारी जी पोरे होती ती पकडून कॉलनीत पाठवली होती. त्यामुळे कॉलनीत काराबानो, प्रिखोकोव, गोलस, सरोका, वेर्शनेव्ह, मिट्चामिन वगैरे नव्या नावांची भर पडली. ☐

## प्रकरण आठवे

# चारित्र्य व संस्कृती

कॉलनीत नव्याने भरती झालेल्या मुलांनी आमचे सामुदायिक जीवनतत्त्व अगदी मुळापासून हादरवून सोडले. त्यामुळे जी अगोदर थोडी स्थिरस्थावरता आली होती ती पार कोसळून पडली व पुन्हा एकदा आम्ही आमच्या जुन्या वाईट प्रवाहात पडलो.

आमच्या जुन्या लोकांना कशीबशी शिस्तीची अगदी नुकतीच ओळख झाली होती; पण नवीन लोकांना शिस्त हा शब्दच जणू माहीत नव्हता. त्यामुळे त्यांना कोणत्याही कायदे व शिस्तीत बसवणे कठीण होते; पण अर्थात सुरवातीसारखी वादळे झाली नाहीत किंवा शिक्षकमंडळींचा विरोध झाला नाही. कारण झादारोव, तारानेटस् व बुरुन वगैरे मुलांनी नव्यांना कॉलनीच्या सुरवातीच्या दिवसांची थोडी आधीच जाणीव करून दिलेली होती. नव्या व जुन्या दोघांनाही शिक्षकवर्ग आपल्याविरुद्ध नाहीत याची कल्पना होती. ही जाणीव होण्याचे कारण म्हणजे शिक्षक खरोखर एवढे स्वार्थत्यागी व शिकविण्यात वाकबगार होते की, आपोआपच त्यांच्याबद्दल आदर वाटू लागे. मुलांनी पण अत्यंत कष्ट घेतले शिकण्यासाठी. शिक्षकांशी चांगली वर्तणूक ठेवली. त्यामुळेच शिक्षकांना मुलांकडून कधी त्रास झाला नाही. त्यामुळे आम्हाला दोघांनाही त्रास झाला नाही. आळस किंवा चुकारपणा या गोष्टी शारीरिक पीडेमुळेच दिसत. विरोध म्हणून कधी असहकार झाला नाही.

कोणतीही नवी सुधारणा ही बाहेरून लावलेल्या शिस्तीतून येणार नाही म्हणून अगदी प्रथमावस्थेतल्या समाजाच्या संस्कृतीचा वापर केला नाही.

एकंदरीने पहाता या मुलांनी इतक्या अडचणींना तोंड देऊन पळून न जाता व अत्यंत गरिबीत रहाणे हे जरा विशेषच होते. याचे मूल्यमापन शिक्षणाच्या स्तरावरून करता येणार नाही; परंतु हेही खरंच की १९२१ साली रस्त्यावर दिवस काढण्यात तसे काहीही प्रलोभन नव्हते. आमचा भाग जरी दुष्काळी भागात मोडत नसला तरी शहरातूनही परिस्थिती फार वाईटच होती. सगळ्याच गोष्टींची कमतरता होती. आमची विद्यार्थी मंडळी तसे पाहिले तर सर्वस्वी उन्मार्गी नव्हती; पण त्यांची घरे-दारे मोडून आई-बापांचा ठावठिकाणा नसलेली अशी होती.

ही सारी मुले अर्थातच निरनिराळ्या स्वभावांची अशी होती. त्यामुळे त्यांची सांस्कृतिक पातळी बरीच खाली होती. मुद्दामच अशा मुलांची आमच्या कॉलनीत भरती झाली होती. त्यांपैकी बरीचशी निरक्षर किंवा थोडीफार अक्षरओळख असलेली होती. ती अत्यंत घाणेरडी व गलिच्छ परिस्थितीतून आलेली होती. आपापसात द्वेष करणे, दुसऱ्याला मारणे म्हणजेच शौर्य अशीच त्यांची कल्पना असावी.

त्यातल्या त्यात झादारोव, बुरुन, वेटकोवस्की, ब्राटचिन्को वगैरे मंडळी ही हुषार व सभ्य समाजातली म्हणता आली असती. नव्यापैकी सुद्धा काराबानोव आणि मिटचाजिन ही सोडली तर सारा गाळसाळच होता. माणसात यायला त्यांना बराच वेळ लागला. अर्थात आमची दरिद्री परिस्थिती पण त्याला कारणीभूत होतीच.

प्रथम वर्षी आपसातील भांडणे ही एक माझी स्वतःची डोकेदुखी होती. सामूहिक राहाणीमुळे साधारणपणे एकमेकांत आपुलकी निर्माण व्हावी; पण याउलट क्षुल्लक कारणांवरून ती वर्दळीवर येत. आपसातल्या शत्रुत्वातून मारामारी उद्भवत असे, असेच नव्हे तर आपण जास्त बलिष्ठ आहोत या अहंगंडातून मारामारी उद्भवे. राजकीय ज्ञान तर नव्हतेच. वास्तविक ही मंडळी वर्गशत्रूच्या गोटात वावरलेली होती; पण तरीही वर्गीय एकजूट म्हणजे काय याची बिलकूल जाणीव नसलेली अशी होती. आमच्याकडे कामगारांची फारच थोडी मुले होती. त्यामुळे वर्गजागृत माणूस ही गोष्ट त्यांनी ऐकलेलीच नव्हती. कष्टकऱ्यांच्या जीवनाबद्दल काही योजना माहीत नव्हती. शेतकरी व शेतमजूर यांच्याबद्दल या मुलांना तिटकारा होता. अशा परिस्थितीत मानसिक एकटेपणातून अतिरेकीपणा, आपली ताकद दाखविण्यासाठी दादागिरी आणि कधीकधी रानटीपणापर्यंतही मजल जाई. अशी जरी निराशाजनक परिस्थिती असली तरी तशाही स्थितीत सामुदायिक जीवनाची झाक जी पहिल्या हिवाळ्यात आम्ही उजळवली होती ती जाऊ न देता या प्रथमावस्थेतल्या जाणिवेची जपणूक करणेच अतिशय महत्त्वाचे काम होते. मी या गोष्टीची वेळीच दखल घेतली व त्या दृष्टीने पावले उचलली हेच माझे खरे श्रेय. दुसरी कोणतीही दूषित छाया या सत्प्रवृत्तीवर पडू नये हेच माझे खरे कर्तव्य होते. हे काम इतके अवघड होते व दीर्घकाळ चालणारे होते आणि याची जर सुरवातीलाच मला कल्पना आली असती तर मी भीती धरून कदाचित हे सोडूनच दिले असते. मी जरा फाजील आशावादी म्हणायचा. कारण मला प्रत्येक वेळी 'आपण आता जिंकलेच' असा भास होई.

त्या काळात एकेक दिवस हा एक तर अत्यंत आनंदाचा, अत्यंत दु:खाचा किंवा अतीव पश्चात्तापाचा असाच घालवावा लागला.

अशाच एका दिवशी दिवसाचे सारे कामधाम संपवून, उदा. वाचन, मनन, खेळ इत्यादी आणि 'स्वस्थ झोपा' अशी सदिच्छा व्यक्त करून शिक्षकमंडळी आपापल्या खोल्यांतून झोपण्यासाठी गेली. मुलेही आपल्या डॉरमिटरीत झोपण्याच्या तयारीत होती. माझ्या खोलीतही हळूहळू आवराआवर होत होती. कालिनासाहेब नेहमीप्रमाणे कुणावर तरी टीकास्त्र झोडीत होते. ब्राटचिन्को आणि गुड हे मात्र माझ्या ऑफिसच्या बाहेर रेंगाळत होते. बहुधा कालिनासाहेबांना गुरांच्या व घोड्यांच्या खाण्याबद्दल पुन्हा एकदा हटकण्यासाठी ते वाट पहात असावेत. एकाएकी काही गडबड झाली व आरडाओरडा झाला की, 'मुलं एकमेकांना सुऱ्यांनी भोसकताहेत.'

मी धावतच मुलांच्या डॉरमिटरीत गेलो. तिथे खूप गोंधळ चालू होता. एका कोपऱ्यात दोन गट उभे होते. शिव्यागाळी व त्याबरोबर एकमेकांना धमक्या देण्याच्या पावित्र्यात ते होते. अत्यंत घाणेरड्या भाषेत एकमेकांना सुनावणी चालू होती. एक जण कोणी तरी दुसऱ्याचा कान पिरगाळत होते. बुरुनने नुकताच कुणाच्या तरी हातून एक चाकू काढून घेतलेला होता. खोलीच्या दुसऱ्या टोकाकडून त्याला कोणी तरी धमकावीत होते, 'तुला कोणी मध्ये लुडबुडायला सांगितलं? तुलाही प्रसाद हवाय काय?'

खाटेच्या एका कोपऱ्यावर बसून एक जण आपली जखम चादरीच्या फाडलेल्या चिंधीने बांधीत होता.

माझ्यामागे उभा राहून कालिना भेदरलेल्या आवाजात मला पुढे होऊन ते द्वंद्वयुद्ध सोडविण्याचा तगादा लावीत होता. 'नाही तर ते एकमेकांचा जीव घेतील.'

माझा एक नियम होता की, मारामारी करणाऱ्यांना मध्ये पडून कधी सोडवायचं नाही. म्हणून मी दरवाजात उभा राहून हे दृश्य शांतपणे पहात होतो. हळूहळू मी तिथे उभा असल्याची मुलांना जाणीव होऊ लागली. सारे शांत होऊ लागले. त्या शांततेमुळे काही भडकलेली डोकी शांत झाली. चाकू फेकून दिले गेले. गुद्दागुद्दी, शिवीगाळ सारेच एकदम थांबले; पण मी तरीही शांतपणा सोडला नाही. आतून मात्र राग आणि आमच्या या रानटी प्रवृत्तीबद्दल तिरस्कार ओतप्रोत भरला होता. तो तिरस्कार माझ्या अगतिकत्वाचा होता. कारण आजचा प्रकार काही शेवटचाच प्रकार नव्हता, तर हे वरचेवर घडणारे होते.

शेवटी एकदाची डॉरमिटरीत भयानक शांतता पसरली. दबलेल्या श्वासोच्छवासांचा आवाज पण स्पष्ट ऐकू येत होता.

आता ती शांतता असह्य व्हायला लागली व माझी कृती अगदी योग्य आहे अशी पुरेपूर खात्री झाल्यावरून मी रागाच्या आविर्भावात मोठ्याने ओरडलो, 'सगळ्यांनी सगळ्या चाकू, सुऱ्या टेबलावर आणून ठेवा.'

स्वयंपाकातल्या, जेवणघरातल्या, पेन्सिल तासायच्या वगैरे वगैरे चाकू–सुऱ्यांचा टेबलावर ढीग पडला.

अजूनही त्या शांततेचा भंग झाला नव्हता. टेबलाजवळ उभा राहून माझा आवडता शिष्य झादारोव आणि मला वाटणारा हा एकमेव आधार मंदस्मित करीत होता.

'अजून काही राहिलंय?'

'होय. माझ्याकडं एक आहे.' झादारोव म्हणाला.

सगळेजण माना खाली घालून शांतपणे उभे होते. 'ताबडतोब आपापल्या बिछान्यावर झोपा!' असा मी हुकूम केला. सगळेजण बिछान्यावर पडेपर्यंत मी डॉरमिटरी सोडली नाही.

दुसऱ्या दिवशी मुलांनी रात्रीच्या प्रकाराची ओळखही दाखविण्याचे टाळले. मी सुद्धा मग त्या गोष्टीचा उल्लेखही केला नाही.

असेच एक दोन महिने गेले. मधूनमधून केव्हा तरी त्या रात्रीसारखी पुनरावृत्ती व्हायची. काही मंडळी गुंडगिरी करायची; पण आमच्या सामूहिक जीवनाला रुळलेली मुले ते तिथल्या तिथे दडपून टाकीत; पण तरीही काही मुलांचा विचित्रपणा कमी होत नव्हता. ती एकमेकांना सुऱ्या दाखवीतच.

मग मला एक दिवस वाटले की, याला आळा घातलाच पाहिजे. या गोष्टी वारंवार घडू देणे योग्य नव्हे. अशीच एकदा मारामारी झाल्यावर मी चोबोटला माझ्या खोलीत जाऊन बसायला सांगितले. तो एकदम जणू काही शेळीसारखा होऊन माझ्या खोलीत बसला.

चोबोटला मी स्पष्ट सांगितले, 'तुला इथून जावे लागेल.'

'मी कुठं जाऊ?' त्याने विचारले.

'तुला जिथं मारामारी करता येईल अशा ठिकाणी तू जावंस असा माझा सल्ला आहे. तुझ्या एका मित्रानं जेवणाच्या टेबलावरची जागा सोडायचं नाकारलं म्हणून तू त्याला सुरीनं भोकसलंस, ठीक आहे. जिथं सुरामारीचे सारे प्रश्न सोडविले जातात अशा ठिकाणी तू जावं हे रास्त आहे.'

'मग मी केव्हा जाऊ?' असे त्याने विचारले.

'तू उद्या सकाळीच जावं हे बरं!'

तो अगदी मोडून पडला. दुसऱ्या दिवशी नाश्त्याच्या वेळी सारी मुले माझ्याभोवती जमली व 'शोबोटला घालवू नका' असा आग्रह धरू लागली. 'त्यानं काही केलं तर आम्ही त्याचा जाब देऊ,' असे विनवू लागली.

'याला प्रमाण काय ते सांगा!'

पण त्याचा त्यांना अर्थ समजला नाही म्हणून मी जास्त फोड करून सांगितले, 'समजा, त्यानं पुन्हा जर भोसकाभोसकी केली तर तुम्ही काय कराल! त्याचा काय जाब द्याल तुम्ही?'

'तसं झालं तर त्याला नंतर हाकलून काढा!'

पण माझा निश्चय कायम होता. 'नाही, तो गेलाच पाहिजे!'

नाश्ता संपवून-शोबोट माझ्याकडे आला. अभिवादन करून म्हणाला, 'आन्तोन, आपण दिलेल्या प्रायश्चित्ताबद्दल मी आभारी आहे. येतो मी!'

'ठीक आहे. तू जा. बाहेरची परिस्थिती फार विकट आहे असं वाटलं तर परत ये. चांगला पंधरवडाभर बाहेरच्या जगाचा अनुभव घे.'

एक महिन्यानंतर शोबोट परत आला. अतिशय दीनवाणा व पार बदललेला दिसला.

'तुम्ही म्हणालात तसंच आहे आणि म्हणून मी परत आलो.'

'तुला पाहिजे ती संधी बाहेर मिळाली नाही का?'

तो स्वत:शीच हसला. 'नाही मिळाली. आन्तोन, बाहेरच्या जगात पुष्कळ जागा आहेत; पण मला तिकडे जायचं नाही. मला इथंच राहू द्या. मी पुन्हा भोसकाभोसकी करणार नाही!'

आम्ही दोघे डॉरमिटरीत गेलो. साऱ्या मुलांनी आनंदाने आमचे स्वागत केले.

'आन्तोन, तुम्ही त्याला क्षमा केलीत? तुम्ही त्याला क्षमा कराल याबद्दल आम्हाला खात्री होतीच!'

[क्रमश:]

# गानमहर्षींचे स्मृतिमंदिर

अरविंद गजेन्द्रगडकर

अपार कष्ट करून संगीताच्या गंगेचा ओघ, उत्तरेच्या ग्वाल्हेरातून वळवून ज्यांनी महाराष्ट्रात आणला आणि ज्यांनी महाराष्ट्राच्या अभिजात संगीताच्या परंपरेची सुरुवात केली, त्या गानमहर्षी कै. पं. बाळकृष्ण-बुवा इचलकरंजीकरांच्या स्मृति-मंदिराच्या उद्‌घाटनाचा सोहळा नऊ फेब्रुवारीला मोठ्या थाटामाटात पार पडला.

ज्या थोर गायकाच्या सुरेल पराक्रमामुळे, इचलकरंजीचे नाव सर्व भारतभर प्रसिद्धी पावलं, त्या गायकाच्या स्मृतीसाठी काही तरी करावं असं इचलकरंजीच्या लोकांना बरेच दिवस वाटत होतं; पण या योजनेला प्रत्यक्ष चालना मिळाली ती पु. ल. देशपांडे यांच्या उद्‌गारामुळे. पन्नासावं साहित्यसंमेलन इचल-करंजी इथं भरलेलं असताना, त्या संमेलनाचे अध्यक्ष पु. ल. देशपांडे यांनी एक व्यथा व्यक्त केली. 'एवढ्या मोठ्या गायकाचं साधं स्मारकही या गावात असू नये ही या गावाला मोठीशी भूषणावह गोष्ट नव्हे !' या त्यांच्या उद्‌गारामुळे इचलकरंजीचा संगीतप्रेमी मंडळी उत्साहाने कार्याला लागली आणि त्यांच्या कृतिशील संगीतप्रेमातून आजचं हे सुबक स्मृतिमंदिर साकार झालं.

पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर संगीत-साधना मंडळाचे कार्यकर्ते कामाला लागले आणि भराभर अनुकूल अशा घटना घडू लागल्या. मदतीसाठी हजारो हात पुढे आले. इचलकरंजीचे दानशूर रसिक श. बा. माळी-मास्तर यांनी आपल्या मालकीची मध्यवर्ती जागा मंडळाला या कार्यासाठी दिली. इचल-करंजीच्याच गुरुवर्य पां. एम्. रानडेगुरुजींनी आपल्याला मिळालेल्या हजारो रुपयांच्या गुरुदक्षिणेच्या थैलीत, स्वतःच्या दानाची भर घालून ती रक्कम मंडळाला अर्पण केली. बघता बघता इतरही दानशूर पुढे आले आणि ही वास्तू उभी राहिली.

नऊ तारखेला संध्याकाळी ही वास्तू रंगीत दिव्यांच्या माळांनी सजलेली होती. वास्तूला लागूनच भव्य मंडप टाकला होता. या वास्तूचं उद्‌घाटन प्रसिद्ध गायक पं. मल्लिकार्जुन मन्सूर यांच्या हस्ते झालं. वास्तूमध्ये बसविलेल्या बुवांच्या संगमरवरी पुतळ्याचं अनावरण पं. कुमार गंधर्व यांनी केलं. हा पुतळा प्रसिद्ध शिल्पकार आणि संगीताचे उपासक कै. र. कृ. फडके यांचे शिष्य श्री. राजाभाऊ मेहूणकर यांनी केलेला आहे.

उद्‌घाटनाचा हा सोहळा पार पाडून सर्व मंडळी मंडपात आली. मंडप गच्च भरला होता. सनईचे स्वर आसमंतात पवित्र वाता-वरण निर्माण करीत होते. अशा या मंगलमय वातावरणात समारंभाला सुरुवात झाली. रंगमंचावर समारंभाचे अध्यक्ष पु. ल. देशपांडे होतेच. त्याशिवाय प्रा. बा. र. देवधर, कुमार गंधर्व, मल्लिकार्जुन मन्सूर, वसंतराव देशपांडे इत्यादी मंडळीही बसलेली होती.

इचलकरंजीचे गायक श्री. प्रभाकर शेंडे यांनी बसविलेल्या स्वागतगीतानंतर श्री. अनंतराव भिडे यांनी प्रास्ताविक केलं. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री. गजाननराव कांबळे यांचं भाषण झालं आणि त्यानंतर पु. ल. देशपांडे यांनी माईकचा ताबा घेतला. प्रा. बा. र. देवधर यांच्या हस्ते स्मरणिकेचं प्रकाशन झालं. त्यांनी आपल्या छोट्याशा भाषणात बुवांच्या अनेक आठवणी सांगितल्या. प्रसिद्ध संगीतज्ञ वामनराव देशपांडे, इचलकरंजीचे वयोवृद्ध नागरिक श्री. अण्णासाहेब कुलकर्णी, कोल्हापूरचे नाट्यसंगीताचे मर्मज्ञ श्री. बाबुराव जोशी, सोलापूरचे श्रीराम पुजारी आणि वसंतराव देशपांडे यांचीही सुंदर भाषणं झाली. या कार्याला प्रत्यक्ष हातभार लावून मदत करणाऱ्या सर्व कलावंतांचा मानचिन्हे देऊन गौरव करण्यात आला. शेवटी पु. ल. देशपांडे यांचं अत्यंत मार्मिक आणि जिव्हा-ळ्यानं ओथंबलेलं भाषण झालं. ते म्हणाले की, 'माझा सर्व हट्ट पुरविणारं माझं आजोळ म्हणजे इचलकरंजी. मी गाण्याचा भक्त आहे. स्वर आणि लय यांना पार्वती-परमेश्वर मानणाऱ्या गायकांचा मी भक्त आहे. या बेसूर जगात सुरांचा शोध घेणारे उपासक हे माझे आप्त आहेत.' पं. बाळकृष्ण-बुवा यांचं हे स्मृतिमंदिर श्रुतिमंदिर व्हावे अशी अपेक्षा त्यांनी शेवटी व्यक्त केली आणि पसायदानाने हा समारंभ सायं-काळी साडेसातला संपला.

पं. मल्लिकार्जुन मन्सुरांनी रात्रीची मैफल अक्षरशः मंत्रमुग्ध केली. जयपूर आणि ग्वाल्हेर या दोन्ही घराण्यांचा सुरेल संगम त्यांच्या गायनात झालेला आहे. पं. बाळकृष्ण-बुवांचे शिष्य नीलकंठबुवा जंगम यांच्याकडे मन्सुरांनी तालीम घेऊन ग्वाल्हेरची गायकी आत्मसात केली आहे. त्याचबरोबर गायना-तले गौरीशंकर आणि जयपूर घराण्याचे प्रवर्तक, मरहूम अल्लादियाखाँ यांचे सुपुत्र मरहूम मंजीखाँ यांच्याकडून त्यांनी जयपूर घराण्याचा वारसा घेतलेला आहे. अशा दोन मातब्बर घराण्यांचे गाणे कंठात घेऊन त्याची इमानेइतबारे जोपासना करणारा हा थोर गायक रंगमंचावर आला तेव्हा लोकांनी टाळ्या वाजवून त्यांचे स्वागत केले. समोर कुमार गंधर्व, पु. ल. वसंतराव देशपांडे, वसंत बापट आणि इतर मर्मज्ञ दाद द्यायला बसले होते. आप्पा जळगाव-करांनी पेटीचा सूर धरला होता. धारवाडचे बसवण्णप्पा भेंडीगिरी तबल्याला होते. एका तंबोऱ्यावर मन्सुरांचे शिष्य पंचाक्षरी मट्टी-गट्टी होते. दुसरा तंबोरा मन्सुरांची कन्या छेडीत होती.

मन्सुरांनी या मैफलीत अनेक प्रचलित राग श्रोत्यांना ऐकवले. बिहागडा रागातल्या झपतालातल्या बंदिशीने त्यांनी गायनाला प्रारंभ केला. सदुसष्टाव्या वर्षी या गायकाचा निकोप आणि निर्मळ आवाज, प्रचंड दमसास आणि गायनातली सौंदर्यदृष्टी याचा जो क्षणोक्षणी प्रत्यय येत होता त्याने श्रोते भारावून जात होते. नटबिहाग रागातली, झनझन झनझन पायल बाजे, ही लोकप्रिय चीज तर त्यांनी नाना अंगांनी नटवली.

सोरठ आणि कौशी या रागांतल्या चिजा गाऊन त्यांनी मध्यंतर केले.

मध्यंतरानंतर जयपूर घराण्याचा खास राग, संपूर्ण मालकंस, त्यानंतर परज, आडंबरी केदार आणि लाजवंती हे गाऊन त्यांनी आपली ही भव्य मैफल रात्री दीड वाजता संपवली. गायनाचं एक भव्य स्वर-शिल्प पाहिल्याचा सुखद अनुभव घेऊन श्रोते घरी परतले. मन्सूरांच्या घराण्यात अप्रचलित राग भरपूर. त्यामुळे त्यांनी गायनाच्या प्रारंभी प्रत्येक रागाचं नाव जर सांगितलं तर श्रोत्यांना गायनाचा आनंद अधिक मोकळेपणाने घेता येईल.

मन्सुरांच्या गायनाच्या आधी इचलकरंजी-करांची पणती कु. सुहासिनी इचलकरंजीकर हिचेही गायन झाले. त्यानंतर बाळकृष्ण-बुवांचे नातू श्री. रामभाऊ इचलकरंजीकर यांचे गायन झाले. या दोघांचे गायन ऐकून गायन ही वंशपरंपरेने येणारी कला नव्हे हीच गोष्ट मनावर ठसली.

रविवारी सकाळी दहा वाजता पुन्हा मंडप शिगोशीग भरला होता. इचलकरंजी-करांची दुसरी पणती कु. ज्योत्स्ना हिने सतारीवर तोडी राग वाजवला. त्यानंतर अकराच्या सुमाराला वसंतराव देशपांडे रंगमंचावर आले. पेटीला आप्पा जळगावकर होते तबल्याला मुंबईचे प्रकाश गोरे होते. चंद्रकांत लिमये हे तंबोरा छेडून गायनाची साथ करीत होते.

वसंतरावांनी सुरुवात केली नटभैरव रागातल्या ख्यालाने. त्या सकाळी वसंतराव अशा तडफेने आणि रंगतीने गायले की त्यांच्या मैफली नेहेमी ऐकणारे-सुद्धा चकित झाले. एखाद्या प्रचंड झंझावाता-प्रमाणे त्यांच्या गायनानं साऱ्या श्रोत्यांना आपल्याबरोबर स्वरांच्या आवर्तात गरगरा फिरवलं. आवाज सुरेख लागला होता. समोर दर्दी श्रोते होते. क्षणाक्षणाला दाद मिळत होती. त्यामुळे वसंतरावांनाही स्फुरण चढलं होतं. वाटेल तसा वाकणारा आवाज, तरल कल्पना आणि विजेच्या वेगानं जाणारी तान यामुळे त्यांचं गायन हा प्रत्येक क्षणी धक्का देणारा सुखद असा स्वरानुभव होता.

समोर जाणकार होते म्हणूनच की काय, वसंतरावानी गौडबिलावल हा अत्यंत अप्र-चलित असा बिलावलाचा प्रकारही नीटसपणे मांडला.

मध्यंतरानंतर ऊनही बरंच वाढलं होतं. तरी श्रोते होते तिथेच बसून होते. वसंतराव पुन्हा रंगमंचावर आले. पेटीच्या साथीला पु. ल. बसले तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. मध्यंतरानंतर वसंतरावांनी मैफलीची गंभीर चौकट बदलली. हलकीफुलकी; पण अप्रचलित रागिणी शोभावरी त्यांनी मोठ्या ढंगदारपणानं आळवली. मध्यलयीच्या झप-तालात सहसा ऐकायला न मिळणारा तराणा त्यांनी सुरेख नटवला. त्यानंतर 'तेजोनिधी लोहगोल' हे त्यांचं लोकप्रिय नाट्यगीत आणि त्यानंतर आणखीन दोन नाट्य गीते गाऊन त्यांनी आपलं झंझावाती गायन दुपारी दोनला संपवलं. या गायनानं श्रोते अगदी आकंठ तृप्त झाले होते.

रात्री साडेनऊ वाजता, कुमार गंधर्वांच्या पत्नी सौ. वसुंधरा कोमकली यांनी आपल्या सुरेल आवाजात शुद्ध कल्याण, केदार, ठुमरी आणि एक भजन सादर केलं. पेटीला आप्पा जळगावकर आणि तबल्याला वसंत आचरेकर होते. रात्री बारा वाजता रसिकांचे लाडके गायक पं. कुमार गंधर्व रंगमंचावर आले. त्यांनी स्वनिर्मित राग 'लगनगांधार' आळ-वायला सुरुवात केली. त्या रात्री रंगदेवता त्यांच्यावर रुसलेली दिसली. कारण जंग जंग पछाडूनही मैफलीत रंग भरेना. कुमारांनी एक राग अर्धवटच सोडून एक 'रसिया' म्हणायला सुरुवात केली. जराशी रंगत आली ती फक्त या रसियालाच. त्यानंतर अवेळी आळवलेला भटियार आणि शेवटी भैरवीतलं गोरखनाथांचं भजन म्हणून त्यांनी मैफलीची आणि या गोड समारंभाची सांगता केली.

□


**तीन राजहंस प्रकाशने**

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

**आणि ड्रॅगन जागा झाला!**
लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

**फिडेल चे, आणि क्रांती**
लेखक : अरुण साधू । मूल्य । सात रुपये

**पूर्णिया**
लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

पुस्तके

# सफर

## प्रांजळ आत्मकथन

'सफर' हे मोहन धारिया यांचे आत्मचरित्र, मराठीत रूढ झालेल्या ठरीव ठशाच्या आत्मवृत्तांपेक्षा अगदी वेगळे आणि मुख्य म्हणजे निकोप आहे आणि तोच 'सफर'चा विलोभनीय विशेष ठरतो. आत्मसमर्थन किंवा आत्मप्रौढी हीच केवळ या वाङ्मयप्रकाराकडे वळणाऱ्या व्यक्तींची एकमात्र प्रेरणा असते की काय, असा संदेह निर्माण व्हावा अशाच पद्धतीने लिहिलेली आत्मवृत्ते नेहमी वाचनात येत असतात. आपण इतर सर्वांना न्याय द्यायचा प्रयत्न केला; पण आपल्यावर मात्र सतत अन्यायच होत आला असाच सूर बऱ्याच आत्मचरित्रांमधून ऐकू येतो. स्वतःवर गैरवाजवी प्रेम करणाऱ्या व्यक्तींच्या आत्मनिवेदनामध्ये 'मी' आणि 'माझे' यांचीच उर्मट दुर्गंधी ठासून भरलेली असते. काही प्रमुख व्यक्तींच्या आत्मचरित्रांच्या संदर्भात बोलणे निघालेले असताना, महाराष्ट्रातील एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकांमधील सार्वजनिक जीवनाचा व्यासंग असलेले एक संपादक म्हणाले होते, 'काकासाहेब गाडगीळ, आचार्य अत्रे आणि ना. सी. फडके यांची आत्मचरित्रे वाचली की महाराष्ट्राचा गेल्या पन्नास साठ वर्षांतील खोटा इतिहास छान कळतो!' त्यांची ही मिष्किल प्रतिक्रिया निश्चितच मार्मिक आहे. या पार्श्वभूमीवर धारिया यांची शालीनता विशेषच नजरेत भरते. एक राजकीय कार्यकर्ता म्हणून आपले आतापर्यंतचे जीवन कसे घडले, वेळोवेळी निर्माण झालेल्या परिस्थितीत आपण कोणती भूमिका घेतली आणि ती भूमिका घेण्यामागे आपला विचार कोणता होता याचा धारिया यांनी अलिप्ततेने काढलेला आलेख' असे त्यांच्या या 'सफर'चे स्वरूप आहे. केवळ आपल्या राजकीय जीवनापुरतेच हे निवेदन मर्यादित ठेवायचे असे धारिया यांनी ठरविलेले असल्यामुळे कौटुंबिक व्यक्तींबाबत वा घटनांबाबत त्यांनी कोठेही फापटपसारा मांडलेला नाही. अगदी आवश्यक तेव्हाच त्यांच्या परिवारातील व्यक्तींचे उल्लेख आलेले आहेत.

सार्वजनिक जीवनाची धारिया यांना लहानपणापासूनच आवड होती आणि त्यामुळे आपल्या मुलाने डॉक्टर व्हावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा असतानाही धारियांनी वकिलीचे शिक्षण घेऊन तो व्यवसाय अंगिकारिला. बालपण महाडसारख्या लहान गावात गेल्यामुळे तेथे धारिया यांच्या सार्वजनिक जीवनकार्याला फारसा वाव मिळणे शक्य नव्हते. महाविद्यालयीन शिक्षणाच्या निमित्ताने पुण्याला आल्यानंतर मात्र त्यांचे हे सार्वजनिक जीवन सतत वृद्धिगत होत राहिले आणि एका कामगार-नेत्यापासून मध्यवर्ती मंत्रिमंडळात आणि नंतर (धारिया यांचा आवडता शब्दप्रयोग वापरायचा तर) 'मिसाराणीच्या मेहेरबानी'मुळे मध्यवर्ती कारागृहापर्यंत त्यांची ही राजकीय सफर घडली. आणीबाणीमध्ये धारियांना कारावास सहन करावा लागला. त्या कारावासामध्ये त्यांनी हे लेखन केलेले आहे. त्यामुळे इंदिरा गांधींनी आणीबाणी जारी करून देशात हुकूमशाही स्थापन करीपर्यंतचा कालखंडच या पुस्तकात आलेला आहे. आणीबाणीचा कृष्णकालखंड केव्हा संपेल आणि त्यानंतर देशात कोणती राजकीय परिस्थिती निर्माण होईल यासंबंधी सगळीच अनिश्चितता असताना धारिया यांनी आपला पस्तीस वर्षांचा जीवनालेख काढताना, जी निर्भयता व्यक्त केलेली आहे ती त्या काळातील जीवघेणे दडपण लक्षात घेता, खरोखरच स्पृहणीय आहे. आपली राजकीय सफर लिहीत असताना धारियांना केवळ स्वतःच्या स्मरणशक्तीवर विसंबून रहावे लागले. संदर्भासाठी कोणतेही कागदपत्र उपलब्ध होणे शक्य नव्हते. तरीही या आत्मनिवेदनाला कोठेही विस्कळितपणा वाअपुरेपणा आलेला नाही.

लोकशाही समाजवाद ही धारियांची जीवननिष्ठा आहे आणि त्यामुळे व्यक्तिमात्राच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करीत असतानाच जे पिढ्यान्‌पिढ्या उपेक्षित राहिलेले आहेत त्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण होईल असे कार्यक्रम अंमलात आणले पाहिजेत असा त्यांनी सतत आग्रह धरलेला दिसतो. येथे त्यांच्या निःस्वार्थतेबरोबर साफ दृष्टी आणि सेवाभावी अंतःकरण यांचा वाचकाला प्रत्यय येतो. मात्र या संबंधात प्रजासमाजवादी पक्षातून काँग्रेसमध्ये केलेला प्रवेश पटत नाही. पं. नेहरूंच्या निधनानंतर काँग्रेस प्रतिगामी शक्तींच्या हातात जाईल हा धोका ओळखून समाजवाद्यांनी त्या पक्षात प्रवेश केला पाहिजे असे या पक्षांतराचे समर्थन केले जाते; परंतु या बाबतीत दोन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. एक अशी की, नेहरूंच्या काळात तरी काँग्रेस खरोखरीच समाजवादी होती का? सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांच्या विस्ताराशिवाय नेहरूंच्या काळातही काँग्रेसने समाजवादाचा एक मूलभूत जीवननिष्ठा म्हणून स्वीकार केलेला दिसत नाही; तसा तो केला असता तर धर्मा तेजा किंवा प्रतापसिंग कैरों यांना नेहरूंच्या राजवटीत भ्रष्टाचाराला किंवा दडपशाहीला मोकळे कारण सापडले असते का, या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर काही वेगळेच असण्याची शक्यता आहे. दुसरे असे की, पुरोगामी किंवा प्रतिगामी अशी लेबले मारून एखादी व्यक्ती स्वीकारार्ह आणि दुसरी निषेधार्ह ठरविता येते काय? सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या दृष्टीने वाटचाल करताना धडाकेबाज आणि डोळे दिपवून टाकणाऱ्या कार्यक्रमाचा पुरस्कार करण्यापेक्षा क्रमशः त्या दिशेने गेले पाहिजे असे सुचविणाऱ्याला एकदम प्रतिगामी ठरविण्यात आपण त्याच्यावर अन्याय करतो याचे निदान विवेकशील पुरोगाम्यांना तरी भान असावयास हवे.

इंदिरा गांधींबाबत धारिया यांची अशीच फसगत झालेली आहे. 'चौदा बँकांच्या

राष्ट्रीयीकरणाची इंदिरा गांधींची घोषणा हा सत्तास्थान सुरक्षित ठेवण्यासाठी अवलंबिलेला नजरबंदीचा खेळ आहे, हे धारिया यांच्या लक्षात यायला बराच वेळ लागला; परंतु येथेही धारिया यांची जमेची बाजू नोंदवायला हवी. आपल्यासारखे अनेक कार्यकर्ते इंदिरा गांधींच्या कपटनीतीचे बळी झाले हे त्यांनी मोकळेपणाने कबूल केले आहे. संजीव रेड्डी यांना राष्ट्रपती करा, असा मोरारजी देसाई यांनी आग्रह धरताच इंदिरा गांधींनी कोणतीही सभ्यता न दाखविता मोरारजीभाईंना मंत्रिमंडळातून काढून टाकले. त्या वेळी आपले पत्र मोरारजीभाईंच्या हातात पडण्यापूर्वी ते आकाशवाणीवरून प्रसृत होईल अशी इंदिरा गांधींनी चोख व्यवस्था केली होती. १९६९ साली इंदिरा गांधींच्या या खुनशी वृत्तीचा मोरारजीभाईंना अनुभव आला. सहा वर्षांनी मोहन धारिया यांच्याबाबतही त्या अशाच वागल्या. १९६९ च्या जुलैमध्ये काँग्रेसच्या संसदीय मंडळाने बहुमताने केलेली संजीव रेड्डी यांची निवड इंदिरा गांधींनी पक्षशिस्त आणि लोकशाही संकेत धुडकावून देऊन अमान्य केली आणि व्ही. व्ही. गिरींना अपक्ष उमेदवार म्हणून उभे करून आपल्या अंकित राहील असा माणस राष्ट्रपतिपदावर निवडून आणला. ललितनारायण मिश्र यांच्यासारख्या भ्रष्ट माणसाला मंत्रिमंडळाबाहेर ठेवा असे धारियांनी सुचविताच इंदिरा गांधींचा एवढा पित्तप्रकोप झाला की, धारियांकडून मंत्रिपदाचा राजीनामा मागण्याचा शहाजोग मार्ग अनुसरण्याऐवजी आपण त्यांना बडतर्फ केले आहे, ही बातमी प्रसिद्ध होण्याचा कावा त्यांनी रचला. धारिया यांनी राष्ट्रपतींकडे आपला राजीनामा पाठवून देऊन इंदिरा गांधींचा कावा सफल होऊ दिला नाही, हे खरे असले तरी वृत्तपत्रे आणि आकाशवाणी यांच्यावरून 'बडतर्फी'-चीच बातमी प्रसिद्ध होत होती.

१९६४ मध्ये मोहन धारिया यांची राज्यसभेवर निवड झाली आणि तेथपासून ते दिल्लीच्या राजकारणात वावरू लागले. तेथपासूनचा अकरा वर्षांपर्यंतचा कालखंड हा त्यांच्या 'सफर'चा गाभा आहे. आपल्या अभ्यासू वृत्तीमुळे एक कुशल संसदपटू असा लौकिक त्यांनी अल्पावधीतच संपादन केला. बहुसंख्य खासदार आपण दिल्लीला पोहोचलो यातच धन्यता मानीत असताना आणि संसद भवनात सहीपुरतेच दिसत असताना, धारिया यांनी देशातील अनेक समस्यांचा विद्यार्थ्यांच्या उत्साहाने अभ्यास केला आणि त्या समस्या सोडविण्यासाठी कोणते उपाय योजले पाहिजेत याचेही वेळोवेळी दिग्दर्शन केले. देशात असंतोषाचे वारे निर्माण झाल्यानंतर दडपशाहीचा आततायी पवित्रा घेण्याऐवजी राष्ट्रीय सुसंवादाचे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी मुख्यतः राज्यकर्त्या पक्षावरच आहे, असे स्पष्टपणे बजावायलाही धारिया कचरले नाहीत. राज्यसभेत प्रथम प्रवेश केल्यानंतर धारिया पं. नेहरूंना भेटायला गेले असताना, 'तू निर्भय संसदपटू हो!' असा नेहरूंनी त्यांना उपदेश केला होता. नेहरूंनी हा संदेश अनेक खासदारांना दिला असेल; पण त्याची कार्यवाही एवढ्या निर्धाराने एकट्या धारियांनीच केली असे म्हटले पाहिजे.

## एकाकी झुंज

मंत्रिपद मिळविण्यासाठी किंवा मिळालेले मंत्रिपद टिकविण्यासाठी इंदिरा गांधींकडून होणारा कोणताही अपमान निमूटपणे सहन करण्यात राजकारणामध्ये इंदिरा गांधींपेक्षा किती तरी ज्येष्ठ असलेले नेते मश्गूल असताना, आणीबाणीपूर्व काळामध्ये धारियांनी किती निधडी झुंज दिली याचे वर्णन खरोखरच प्रत्ययकारी झाले आहे. तो सगळा भाग वाचल्यानंतर, इंदिरा गांधींची एकाधिकारशाहीकडे अगोदरच वाटचाल सुरू झालेली होती आणि अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे निमित्त सापडले नसते तर दुसरे कोणते तरी कारण सांगून किंवा शोधून काढून त्यांनी आणीबाणी जारी केलीच असती हे स्पष्ट होते. आणीबाणी पुकारण्यामागे राजकीय आणि आर्थिक कारणे होती, असे इंदिरा गांधींचे समर्थक अजूनही सांगत असतात. आपले सर्वांनी मुकाट्याने ऐकले पाहिजे, कोणीही मतभेदाचा ब्रदेखील उच्चारता कामा नये असे मानणाऱ्या अहंमन्य व्यक्तीला आपण म्हणजेच देश असे वाटणे स्वाभाविकच मानले पाहिजे. तिच्या या आक्रस्ताळी धारणेला विरोध करण्याचे धैर्य धारियांव्यतिरिक्त एकाही केंद्रीय मंत्र्याने त्या वेळी दाखविले नाही ही वस्तुस्थिती 'सफर'मुळे पुन्हा एकदा प्रकाशात आलेली आहे. ज्या सहजतेने धारिया यांनी मंत्रिपदाचा त्याग केला त्या वृत्तीचा आढळ तर गेल्या तीस वर्षांमध्ये एकाही काँग्रेसजनामध्ये होत नाही.

प्रथम खासदार म्हणून आणि नंतर मंत्री म्हणून धारियांना अनेक देशांना भेट देण्याची संधी मिळाली. या परदेश-प्रवासातही धारियांनी आपली अभ्यासू वृत्ती जागी ठेवली होती. इतरांसारखे केवळ पर्यटक म्हणून ते कोठेही वावरले नाहीत. त्यामुळे पूर्व जर्मनी असो वा चेकोस्लोव्हाकिया असो, युगोस्लाव्हिया असो किंवा जपान असो या परदेशांकडून आपण काय शिकले पाहिजे याचा त्यांनी त्या त्या देशाच्या भेटीचा उल्लेख करताना मार्मिक ऊहापोह केलेला आहे. धारिया राजकारणाच्या धकाधकीत वावरत असले तरी त्यांनी आपली मूळची ऋजू आणि अभिजात रसिकतेची वृत्ती कधीही सोडलेली नाही. त्यामुळे मुंबई-रोम प्रवासात भेटलेली जोन ही अमेरिकन स्वागतसुंदरी, इंग्लंडमधील मार्गदर्शिका डोरोथी किंवा अमेरिकन नायगारा धबधबा दाखविण्यासाठी सोबत केलेले नॉर्टन दांपत्य त्यांच्या स्मरणकोषात कालच घडलेल्या घटनेइतके ताजे, टवटवीत राहते. (डोरोथीची तुरुतुरू चाल आठवताच त्यांना 'तुझी चाल तुरतुरू, उडती केस भुरभुरू' हे शांताबाई शेळक्यांचे प्रणयमोहक गीतही आठवते.) कधी कधी त्यांना नर्मशृंगाराचीही याद होते. मॉस्कोतील अलिशान अतिथिभवनामधील खोलीचे वर्णन करताना ते लिहून जातात, 'बुट्टीदार नक्षीने नटलेला छपरी चमकदार सेवाभावी पलंग सारखा विचारत होता, 'युवर एक्सलन्सी, तुम्ही एकटेच कसे आला?'

धारिया यांच्या आणखीही एका लेखनविशेषाचा आवर्जून उल्लेख करायला हवा. इंदिरा गांधींच्या मंत्रिमंडळातील अखेरचा कालखंड त्यांना अतिशय क्लेशदायक गेला. आपण ज्यांना पंतप्रधान करण्यात पुढाकार घेतला त्यांनी आपल्या पन्नासाव्या वाढदिवसाला आपल्याला साधा शुभेच्छादर्शक फोनही करू नये याचा धारियांना उद्वेग येणे साहजिक होते. असे उपेक्षेचे आणि अवहेलनेचे आणखी किती तरी क्षण 'सफर'मध्ये त्यांनी नमूद केले आहेत.

दुर्गाप्रसाद धर या उधळ वृत्तीच्या ज्येष्ठ सहकाऱ्यानेही अनेक वेळा पंतप्रधानांना खूष करण्याच्या नादात, धारिया यांना योग्य ते महत्त्व दिले नाही. असे असले तरी धर यांच्या निधनाच्या निमित्ताने धारिया लिहितात, 'मंत्रिमंडळातून वगळल्यानंतर धर यांनी इंदिराजींसंबंधी व्यक्त केलेले जळजळीत उद्‌गार कुणाचेही अंतःकरण कापून काढतील. विश्वासात घेऊन त्यांनी काढलेले उद्‌गार प्रसिद्ध करणे मित्र या नात्याने योग्य ठरणार नाही म्हणूनच ते येथे देत नाही.' धारिया यांनी व्यक्त केलेले औदार्य, सदभिरुची जोपासण्याच्या त्यांच्या वृत्तीचे ठळक निर्देशक आहे.

'सफर' हे एका मनस्वी वृत्तीच्या राजकीय कार्यकर्त्याचे आत्मवृत्त असल्यामुळे १९४० ते १९७५ या पस्तीस वर्षांतील अनेक महत्त्वाच्या राजकीय घडामोडींची नोंद त्यात आलेली असली तरी ते कोठेही रुक्ष वा नीरस झालेले नाही, याचे कारण धारिया यांची अत्यंत प्रवाही आणि प्रसन्न शैली! पस्तीस वर्षांचे एवढे बारकावे धारियांनी लक्षात कसे ठेवले याचेच नवल वाटते. जपानमधील फुजी हा पर्वत पहायला जाताना ह्याटा हा बोलघेवडा मार्गदर्शक त्यांच्याबरोबर होता. त्याच्यासंबंधी धारियांनी लिहिले आहे, 'धोकादायक पहाडातून वेडीवाकडी वळणे घेत अंग चोरून जाणारी प्रवासी बससुद्धा ह्याटाचे बोल ऐकून सुखावल्यासारखी वाटे!' शाळेत असताना धारिया आणि त्यांचे बंधू नाट्यप्रयोगामध्ये भाग घेत असत. त्यासंबंधी लिहिताना त्यांनी गमतीदारपणे म्हटले आहे, 'हा नाट्यप्रवेशाचा पडदा शालेय शिक्षणानंतर खाली आला तो पुन्हा केव्हाच उघडला नाही. राजकीय नाटकात पदार्पण केल्यानंतर ते शक्यही नव्हते!' रायगडाच्या पायथ्याशी असलेले नाते हे धारियांचे जन्मगाव. (चिंतामणराव देशमुखांचे जन्मगावही हेच! धारियांच्या राजीनाम्यानंतर आंध्रमधील एक वृद्ध खासदार सूर्यनारायण धारियांना म्हणाले, 'ज्या मध्यवर्ती मंत्र्यांची राजीनामा भापणे गाजली असे मंत्री दोनच! एक सी. डी. देशमुख आणि दुसरे मोहन धारिया. त्या दोघांचे जन्मगावही एकच नाते!') आपल्या या जन्मगावालगतचा परिसर वर्णन करताना धारियांची लेखणी ललितवैभव धारण करते, 'महाडच्या पूर्वेस काही अंतरावर सावित्री आणि काळ या नद्यांचा आणि पश्चिमेस गावाजवळच सावित्री आणि गांधारी यांचा पवित्र संगम झाला आहे. काळ व गांधारी यांना कवेत घेऊन जाणारी सावित्री हळूहळू वयात येते आणि पुढे एकीकडे बाणकोट व दुसऱ्या बाजूस बागमांडले या निसर्गरम्य गावांना साक्ष ठेवून अरबी सागराबरोबर विवाहबद्ध होते.... सुकुमार सावित्रीचा जरठ अरबी सागराबरोबर होणारा विवाह पुरोगामी विचारांना सारखा खटकत असला तरी त्या विवाहसोहळ्याचे अलिशान राजवैभव आपले डोळे दिपवून सोडते!'

निसर्गसौंदर्याचा रसीला आस्वाद घेण्याची ही वृत्ती केवळ जन्मगावापुरतीच मर्यादित राहिलेली नाही. जेथे जेथे निसर्गाचे विभ्रम पाहायला मिळाले तेथे तेथे धारियांमधील कविमन लगेच जागृत झालेले आहे चेकोस्लोव्हाकियासंबंधी ते लिहितात, 'काही देशांवर निसर्गराजाने अशी काही प्रेमाची पखरण केली आहे की, त्यांच्या भूमीवरील भरजरी हिरवा शालू दिवसाढवळ्या थोडाही ढळला तरी त्याला आवडत नाही. कडक हिवाळ्यामध्ये शुभ्र लोकरीच्या हिमवस्त्रात तो त्या भूमीला लपेटून ठेवतो आणि थंडी संपली की, त्या महावस्त्राची घडी करून ते एखाद्या उंच पर्वतावर हळूच ठेवतो! स्वच्छ जलप्रवाहांचे चंदेरी काठ लावलेला हिरवा शालू परिधान करून ती भूमी दिमाखाने पुन्हा मिरवू लागते. अशाच नशीबवान देशांमधील चेकोस्लोव्हाकियाने आमच्यावर मोहिनी घातली होती!' नवी दिल्ली आणि जुनी दिल्ली यांच्यातील विषमतेच्या विद्रूप तांडवाचे रेखाटन करताना धारियांची लेखणी तेवढीच दाहकही होते.

असे हे अथपासून इतिपर्यंत प्रांजलतेचे दुर्मिळ लेणे लेवून अवतरलेले आत्मवृत्त मराठीच्या साहित्यसंभारामध्ये आपल्या विनम्र वृत्तीमुळे आणि त्याचबरोबर प्रखर ध्येयनिष्ठेमुळे सन्मानित स्थानावर विराजमान व्हायला काहीच प्रत्यवाय नसावा. कारण त्याला सच्चेपणाची अविरत साथ लाभलेली आहे. धारिया यांनी प्रारंभी म्हटले आहे ते खरे आहे. समर्थ सागराला धडक देण्यासाठी साहसाने सफर करणाऱ्या गांधारी आणि सावित्री यांच्या शुभ्र प्रवाहात त्यांची धवल जीवनसफर प्रतिबिंबित झालेली आहे.

–वि. स. वाळिंबे

**सफर**

लेखक : मोहन धारिया
प्रकाशक : विश्वकर्मा साहित्यालय, पुणे
पृष्ठे : ३७८. मूल्य : चाळीस रुपये

---

**'कलाकृतीची संदर्भमुक्तता लाभलेली समर्थ कलाकृती'**
–प्रा. स. शि. भावे

# जनांचा प्रवाहो चालिला

विनय हर्डीकर । राजहंस प्रकाशन, पुणे । किंमत वीस रुपये

उशीरा
होऊ द्या
पहिलं

अंतर
सोडून
दुसरं

भावी
मातापित्यांशी
हितगुज

कधीच
नको
तिसरं

आपल्या जवळचे कुटुंब नियोजन केंद्र,
प्राथमिक आरोग्य केंद्र, अथवा जन आरोग्य रक्षक
आवश्यक मार्गदर्शन करण्यास आणि
आवश्यक साधनसामग्री देण्यास हजर आहेत.

त्यांना आजच भेटा

davp

davp 78/497

# मुंबई वार्ता : पृष्ठ ४ वरून

तळ्यांमध्य साठवण करण्याची योजना अव्यवहार्य नाही. या पाण्याचा वापर करून कोकणातील पडीक जमिनीचा वापर केला जावा. त्यासाठी महामंडळाने अर्थसहाय्य द्यावे. तसेच या जमिनीत काजू, अननस, कागदासाठी गवत, अंबाडी, सिट्रोनेला इ. नगदी पिके काढण्याची गोगटे यांची सूचना आहे. कोकणात रबराची लागवड होण्यासाठी प्रयत्न व्हावे असेही त्यांनी सुचविले आहे.

कोकणविकासाची श्री. गोगटे यांची योजना खूपच कल्पकतापूर्ण आहे. या १० कलमी महत्त्वाकांक्षी योजनेसाठी नवे महामंडळ स्थापन करणे जर शक्य नसेल, तर निदान कोकण विकास महामंडळाला तरी हा प्रकल्प हाती घेण्यास सांगण्यात आले पाहिजे. चेंबर ऑफ कॉमर्स लवकरच रत्नागिरीत एक उद्योगविकासपरिषद घेणार आहे. ह्या व अशा उपक्रमातूनच कोकणविकासाला चालना मिळू शकेल. राज्यसरकारचे या दृष्टीने जे प्रयत्न सुरू आहेत, त्यात श्री. गोगटे यांच्यासारख्या कल्पक उद्योजकाचे योगदान लाभदायी ठरेल. □

## □ दशमान कालगणना

नवे नवे म्हणता म्हणता हे वर्ष आता जुन्यात जमा झाले. नवे वर्ष आणि नव्या कोऱ्याकरकरीत दिनदर्शिका यांचा अतूट संबंध आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा सर्वांनीच नव्या वर्षाची आकर्षक कॅलेंडरे घराघरात भिंतींवर लटकवली असतील. मुंबईचे डॉ. शं. ह. मराठे यांनी मात्र आपण लावतो तसले नव्हे तर, फक्त दहा महिन्यांचे आणि तरीही ३६५ दिवसांचे वर्ष असलेले त्यांचे स्वतःचे 'दशमान कॅलेंडर' आपल्या घरात लावले आहे.

व्यवसायाने डॉक्टर असलेले श्री. मराठे दशमान कालगणनेच्या कल्पनेने जवळजवळ झपाटलेले आहेत. जीवनाच्या सर्व क्षेत्रात आपण, दशमानपद्धती आणली मग सर्वाधिक सुलभ, सोपी अशी ही पद्धत कालगणनेत का नको या विचारातून त्यांनी या कल्पनेचा सविस्तर अभ्यास केला आहे या अध्ययनानंतर ही कल्पना अधिकाधिक व्यवहार्य स्वरूपात त्यांनी सादर केली आहे. अलीकडेच एका वार्ताहर बैठकीत मोठ्या उत्साहाने डॉ. मराठे यांनी ही कल्पना समजावून सांगितली.

आज आपण दिवसाचे २४ तास मानतो. डॉ. मराठे यांच्या कालगणनेत दिवसाचे २० तास राहतील. यात दहा तासांचा दिवस व दहा तासांची रात्र राहील. नव्या तासाची मिनिटे १०० व प्रत्येक मिनिट १०० सेकंदांचे. नव्या व्यवस्थेत सकाळी ६ ला दिवस सुरू होईल; पण तेव्हा घड्याळात ० वाजतील. त्यानंतर ७ वाजता १ वाजेल, असे १० तास दिवसाचे व नंतरचे १० तास रात्रीचे.

दशमान कालगणनेत असे वीस तासांचे ३६ दिवस झाले की, एक महिना होईल. प्रत्येक महिन्याची सुरुवात सोमवारी होईल आणि प्रत्येक महिन्यात ५ रविवार येतील. रविवार हा सुट्टीचा दिवस, त्यामुळे या दिवसाला स्वतंत्र दिनांक न देता ५ तारखेच्या शनिवारनंतर ५+ही व अशीच तारीख असेल. म्हणजे ३६ दिवसांचा महिना होऊनही कॅलेंडरमध्ये तो ३० दिवसांचाच राहील. असे ३६ दिवसांचे १० महिने गेले की, वर्षाचे ३६० दिवस संपतील. शेवटचे पाच दिवस वार्षिक सुट्टीचे दिवस मानावेत. कुणी याला ख्रिस्मस म्हणतील, तर कुणी आणखी काही. मराठे यांच्या मते या दिवसांना आशिया, युरोप, अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया या खंडांची नावे द्यावीत.

३६५ दिवसांचा हा हिशोब असा पूर्ण झाला! सध्या १२ महिने आहेत, त्यातले जुलै व ऑगस्ट हे व्यक्तिवाचक महिने काढून टाकले की, फक्त दहा महिने उरतात व असे हे दशमान कालगणनेतले एक वर्ष पूर्ण होते.

हा सारा खटाटोप कशासाठी? तो केल्याने काय साधणार? साऱ्या जगात ही पद्धत कशी मान्य होणार? हे सारे प्रश्न आहेत. डॉ. मराठ्यांच्या मते हे सारे सुलभ व्यवहारासाठी आहे व एकदाच ही नवी घडी बसण्यासाठी खटाटोप केला की मग अडचणी येणार नाहीत.

डॉ. मराठ्यांची कल्पना अभिनव व म्हणून निदान Interesting तरी नक्कीच आहे. व्यवहारात आणणे सोपे नाही हेही खरेच! पण म्हणून अशा नव्या शास्त्रीय कल्पना सोडून देता येणार नाहीत. किमान वाचकांनी त्यावर विचार तरी करावा, अशी डॉ. मराठ्यांची साधी सरळ अपेक्षा आहे. □

मराठी चित्रपट । सदानंद बोरसे

# सोबती

**अभिनयाने तारून नेलेला चित्रपट**

गेल्या काही दिवसात थोडया-फार अंतराने पुण्यात एक सोबती, दोन चंद्र, आठ विनायक अशी बरीच मराठी मंडळी दाखल झाली. पैकी एक चंद्र 'चांदोबा, चांदोबा, भागलास का?' असे विचारून पूर्ण होते न होते, तोच पाहता पाहता पसारही झाला. विनायकरावांचा डेरा नुकताच दाखल झाला आहे. राहता राहिले एक सोबती आणि एक चंद्र.

'सोबती'द्वारे निळू फुले अभिनयाबरोबरच पटकथा, संवाद आणि दिग्दर्शन (सोबतीचे सहदिग्दर्शक म्हणून) याही क्षेत्रात उतरले आहेत; पण 'सोबती'त तरी त्यांची कामगिरी फार भरीव वगैरे काही नाही.

सोबतीची कथा घडते एका खेडयात. त्या खेडयातील फुला नावाची साधीभोळी मुलगी म्हणजेच कळी. ती फुलतबिलत असताना एक भुंगा मध चाखतो अन् दुसऱ्या कळीकडे पळून जातो. मग ही कुस्करली-बिस्करली गेलेली कळी त्याचा मानसिक छळ करते. दरम्यान लक्ष्मण ऊर्फ लंब्या नावाचा एक बावळट गृहस्थ (याच्यामुळेच चित्रपटास सोबती नाव मिळाले असावे.) फुलावर, तिच्या बाळावर वेडी माया करतो. त्या भुंग्याला एकदा बडवतोही. त्या झटापटीत त्या भुंग्याचा म्हणजे डॉ. (जनावरांचे डॉ.) अरुण गुणे यांचा खून होतो आणि लंब्याला फाशी होते; पण देवाची करणी अगाध असल्याने फाशी रद्द होते, शेवट गोड. आता 'आले देवाजीच्या मना, काय कोणाला कळेना,' असाच प्रकार असल्याने कशामुळे फाशी रद्द झाली, हा प्रकार शेवटपर्यंत गूढच राहिला आहे. संपूर्ण कथेला आणि चित्रपटालाही 'सोबती' नाव का दिले आहे, याचाही पत्ता लागत नाही.

एकूण चित्रपटाला कथा होती. त्या कथेचे अनेक प्रकार सांगता येतील किंवा तिच्या वेगवेगळया तुकडयांना वेगवेगळया प्रकारांमध्ये ढकलता येईल. उदाहरणार्थ– फुला व डॉ. अरुणचे सुरुवातीचे प्रसंग ही प्रेमकथा. नंतर फुला आपल्याला फसविणाऱ्या डॉ. अरुणला छळते ती सूडकथा किंवा गूढकथा किंवा रूढकथा. शेवटी फाशीची शिक्षा झालेल्या लक्ष्मणची अचानक सुटका ही सुखांत कथा किंवा उकलकथा किंवा 'साठा उत्तराची कहाणी' कथा. शिवाय कथेला प्रायोगिकतेचाही वास मारत होता. कारण लक्ष्मणची सुटका होण्यास कोणते कारण घडते, जेलरला आलेल्या पत्रात काय मजकूर असतो ही गोष्ट प्रेक्षकांच्या कल्पनाशक्तीवर सोडून दिल्याने अर्धवट शेवट वा 'चुटपूट' शेवट झाला आहे. शिवाय तो मजकूर काय होता, अशी समस्या प्रेक्षकांपुढे उभी राहिल्याने कथा समस्याप्रधानही बनते.

चित्रपटात एकूणच थोडा-फार जीव आणलाय तो तिघांनी. एक शांता जोग. मराठी रंगभूमीवरील या समर्थ अभिनेत्रीचा माझ्या माहितीप्रमाणे हा पहिलाच चित्रपट. तोंडाने अत्यंत फटकळ, मनाने अतिशय प्रेमळ अशी फणसासारखी बायजाबाई शांता जोगांनी अप्रतिम रंगवली. बायजाबाईचे पोरीच्या काळजीपोटी रागावणे, 'गिळा आता,' अशाच खडकाळ शब्दांनी व्यक्त होणारी जिवंत माया आणि बायजाबाईच्या मृत्युप्रसंगीचा विलक्षण सच्चा अभिनय केवळ भिडणारा. दोन– डॉ. श्रीराम लागू. रघू पुजारी हा स्वातंत्र्यलढयात लढलेला एक सैनिक. आत्यंतिक सत्यवादी, कडवा बुद्धिवादी; पण तितकाच प्रेमळ, निश्चयी असा रघू पुजारी डॉक्टरांनी उभा केला. फक्त त्यांच्या संवादफेकीबद्दल मात्र साचेबद्धपणाचा आक्षेप घेता येईल. तीन– निळू फुले. चित्रपटात फुलाच्या खालोखाल वाव असलेली लंब्याची भूमिका निळू फुल्यांनी केली आहे. 'थापाडया'मधील भोळाभाबडा वेटर वा 'सोनारानं टोचलं कान'मधील सुरुवातीचा सोनारच वेगळया कपडयांमध्ये, केस थोडेसे विस्कटून डोळयांसमोर वावरत होता. तसेच थोडेसे पोक काढून चालणे, चेहऱ्यावर तेच भाबडे हसू आणि तेच लाचार, भित्रे डोळे घेऊन लंब्या पडद्यावर वावरत होता. याशिवाय अंजलीची भूमिका करणारी पूर्णिमा हिचेही काम उल्लेखनीय; पण तिची भूमिका अतिशय छोटी होती. बाकी फुलाची मध्यवर्ती व्यक्तिरेखा उत्तरा या नवागतेला अजिबातच पेलली नाही. चेहऱ्यावर सतत एक त्रासिक, थंड भाव घेऊन वावरणे एवढेच फक्त तिने केले. स्वरूपकुमार (डॉ. अरुण गुणे) आणि राघवेंद्र (बाळासाहेब) दोघांनी आपल्या वाटयाला आलेली खलनायकी पूर्णतया कामी आणली आणि तिच्या बरोबरीने चित्रपटातील विनोद नामक प्रकारालाही खांदा दिला.

दिग्दर्शक एम्. एस. राजन यांनी चित्रपटाला दिग्दर्शकाची अजिबात आवश्यकता नसते, हे सिद्ध करून दाखवले.

चित्रपटातील गीते मात्र खूपच चांगली आहेत. संगीत श्रीनिवास खळे आणि गीते गंगाधर महांबऱ्यांची आहेत. अरुण दात्यांनी गायलेल्या 'देवाघरच्या फुला, सोनुल्या' या गीताव्यतिरिक्त बाकीच्या गीतांचे चित्रण म्हणजे एक धंदा तरी आहे वा विनोदी तरी आहे.

रंगीत चित्रपट आणि बऱ्यापैकी चांगली रंगसंगती या अजूनही मराठी चित्रपटांच्या आवर्जून उल्लेख करण्यासारख्या गोष्टी आहेतच. *

# चंद्र होता साक्षीला

**पण पौर्णिमेचा नाही**

गेल्या वर्षीच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे 'देवकीनंदन गोपाला'चे दिग्दर्शक राजदत्त, संगीतकार सुधीर फडके, कलाकारांमध्ये डॉ. श्रीराम लागू, डॉ. काशिनाथ घाणेकर, बाळ कर्वे, यशवंत दत्त अशी नावे– साहजिकच साक्षीला आलेला चंद्र अगदी पौर्णिमेचा नसला, तरी निदान शुद्ध अष्टमी वा नवमीचा असेल असे वाटले होते. प्रत्यक्षात मात्र तो वद्य द्वादशी वा त्रयोदशीचा निघाला!

आपल्याकडे आतापर्यंतचे हिंदी-मराठी सिनेमे बघून लोक इतके शहाणे झाले असतानाही कथालेखकांना अजूनही, मूर्ख, बावळट पात्रे कथेसाठी कशी मिळतात, कोण जाणे! मग अशा पात्रांच्या बावळटपणातून निरनिराळे समज–गैरसमज निर्माण केले की,

झाली आमची कथा तयार ! राम केळकरांनी 'चंद्र होता साक्षीला 'ची कथा अशीच रचली आहे.

एक मनोहर (काशिनाथ घाणेकर) नावाचा तरुण माणिक (कानन कौशल) नावाच्या तरुणीच्या प्रेमात पडतो. त्याच वेळी माणिकचे मनोहरच्या मित्राशी–माधवाशी (डॉ. श्रीराम लागू) लग्न ठरते. मनोहरने 'संगम' सिनेमा पाहिला नसल्याने तो आपल्या मित्रासाठी त्याग वगैरे करून दुसऱ्या मुलीशी प्रेमचाळे करण्याचे नाटक करतो. माणिकनेही 'हमजोली' सिनेमा पाहिला नसल्याने ती मनोहरच्या नाटकाला फसते व माधवशी लग्न करते. मग माधवला एक अपघात होऊन तो मेल्याचा सगळ्यांचा समज होतो. विधवा माणिकला नंदलाल (यशवंत दत्त) नावाचा माधवचा दुसरा एक खलनायक दोस्त पार खड्ड्यात घालू पाहतो; पण अचानक माधव जिवंत असल्याचे कळते. शेवटी मनोहर आपल्या प्राणांचे बलिदान करून माधवला वाचवतो. (अरेरे, या सर्व मंडळींनी एकही हिंदी चित्रपट पाहिलेला नसावा. अन्यथा ती अशी छोट्या छोट्या युक्त्यांना फसली नसती.) या सगळ्या कथानकाला 'सोबती'च्या कथेची उपकथानक म्हणून जोड आहे. केशर (संजीवनी बिडकर – 'सोबती'तील फुला) नावाच्या मुलीला नंदलाल (सो.तील डॉ. गुणे) फसवतो. शेवटी ती त्याचा सूड घेऊन वसंता (सो.तील लंब्या) नावाच्या भो. भा. तरुणाबरोबर लग्न करते.

आता यात चंद्राच्या साक्षीचा संबंध कुठे येतो ? तर 'चंद्र होता साक्षीला' हे गाणे सुधीर फडक्यांना गायला लावून वारंवार मनोहरने चंद्राकडे टक लावीत बसणे आणि चित्रपटाच्या सुरुवातीच्या श्रेयनामावलीत प्रत्येक नावाबरोबर कलेकलेने वाढणारी चंद्रकोर दाखविणे (शेवटी दिग्दर्शक–राजदत्त–की लगेच पूर्ण चंद्र) एवढाच चंद्राचा संबंध! ही कलेकलेने वाढणारी चंद्रकोर तर शेवटी शेवटी लचका तोडलेली वा घास मोडलेली भाकरीच वाटत होती !

या आधीच मिळमिळीत कथेला आणखी असह्य करण्याची कामगिरी सर्व कलाकारांनी सामुदायिकरीत्या पार पाडली. अपवाद फक्त बाळ कर्वे.


डॉ. लागूंना फक्त एकच प्रश्न विचारावासा वाटतो. 'आपण ही भूमिका का स्वीकारलीत ? ' कधी नव्हे ते डॉक्टर या चित्रपटात अत्यंत कृत्रिम व अवघडलेले वाटतात. हो, आणखी एक गोष्ट विसरलो. 'सत्यं, शिवं, सुंदरम्'लाही या चंद्राने ग्रासलेले आहे. फरक इतकाच 'सत्यं'मध्ये झीनत अमान, 'चंद्र'मध्ये डॉ लागू. डॉ. लागूंच्या डाव्या गालावर एक कोळिष्टकासारखा तीन इंच बाय अडीच इंच असा भलाभक्कम व्रण बांधलेला आहे. डॉक्टरांना अधिकाधिक विघडविणे (कामाच्या बाबतीत तर झालेच; पण दिसण्याच्या बाबतीतही) एवढाच त्या व्रणाचा हेतू. अन्यथा चित्रपटात त्यांच्या उपस्थितीचे कारण, शून्य !

डॉ. लागूंसकट बाकी सर्व कलाकार जेवढी डोकेदुखी देत नाहीत, त्याच्या किती तरी पट जास्त तीव्र आणि जास्त भयंकर दुखणी डॉ. काशिनाथ घाणेकरांनी दिली आहेत. सुरुवातीपासूनचे त्यांचे विदुषकी अंगविक्षेप, चेहऱ्यावरील स्नायूंना व्यायाम घडविण्यासाठी तोंडे वेडीवाकडी करणे आणि जड जिभेची कष्टदायक हालचाल करीत बोवडे व अस्पष्ट बोलणे– केवळ भयंकर. त्यांच्या बोलण्याची दोन उदाहरणे सांगतो. एक मूळ वाक्य– 'काय हो, तुमच्या आत्याचं आणि त्या बापूरावाचं काही झेंगट आहे का ?' (असे वाक्य असावे, हाही माझा तर्कच) घाणेकर घेतात ते वाक्य– 'कॅव्हॉ, तुम्या त्याचं त्या वापूरावाचं कॅह (चेहरा प्रचंड वाकडा करीत व डोळे मिचमिचे व चकणे करीत, मानेला दोन हिसडे देत) झेंग्गटे का झेंग्गट ?' दोन– मूळ वाक्य– 'असं बोलू नकोस गं, माणिक प्लीज, असं बोलू नकोस.' घाणेकर घेतात ते वाक्य– (आवाजात प्रचंड थरथर, भेसूर व बेसूर हुंदके. पाठ वळवलेली, त्यामुळे चेहरा दिसत नाही म्हणून बरे.) 'ॲहं बोयूं योस गं, माणिऽऽक, हुझीज, ॲहं ब्रोयूंयोस.' देवनागरीत प्रत्येक अक्षराचा उच्चार ठरलेला असल्याने मला हे फारच स्पष्ट लिहावे लागत आहे. घाणेकरांनी घशाचा उपयोग केल्याने अस्पष्टतेचा त्यांनी घडविलेला चमत्कार म्या पामराला तंतोतंत कसा साधणार ? साहजिकच काशिनाथ घाणेकर पडद्यावर नसताना आणि असले, तर काहीही करीत नसतील तेव्हा सारं कसं शांत शांत वाटतं.

दिग्दर्शक राजदत्त यांच्याबद्दल काय लिहिणार ? 'देवकीनंदन गोपाला'मध्येही त्यांनी काही धंदेवाईक गोष्टी आणल्या होत्या; पण या चंद्राला संपूर्ण रुपेरी धंद्याचे पाणी देणेही त्यांना साधले नाही. स्वतःला राजा परांजप्यांचे पट्टशिष्य मानणारे राजदत्त व 'चंद्र होता'चे दिग्दर्शक राजदत्त बहुधा एक नसावेत. बालकवींचे 'हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणांच्या मखमालीचे' घेतल्यानंतर निदान संपूर्ण कवितेच्या तालासाठी तरी 'त्या सुंदर मखमालीवरती'चे 'त्या मखमालीवरती' करू नये. शिर्डीच्या साईबाबांच्या गुळगुळीत नाण्याचा वापर आता राजदत्तांनी तरी करू नये.

'चंद्र होता साक्षीला'चे गीतकार जगदीश खेबूडकर, संगीतकार सुधीर फडके. या दोघांबरोबरच पार्श्वगायक म्हणून पुन्हा सुधीर फडके व गायिका आशा भोसले या तिघांच्या संयुक्त सुंदर कामगिरीने 'चंद्र आहे साक्षीला' हे गीत सुरेख झाले आहे. पण त्यातही मागे कळणारा सेट, क्षणाक्षणाला कला कमी-जास्त करणारी चंद्रकोर अशा गमती पडद्यावर दाखवल्या आहेतच.

# ही बँक... तुमचीच



अच्छा ... या, या, तुम्ही देखील या ...
पैशाला पाय फारच फुटताहेत असं
वाटतय ? असं करा ना ... बचतीला
उत्तेजन देणाऱ्या कितीतरी आकर्षक
योजना आमच्याजवळ तयार आहेत ...

या. . . या. . . अगदी संकोच करू नका.
तुमचे दागिने, कागदपत्र सांभाळायचेत ना ?
त्यासाठी आमच्या सेफ डिपॉझिट लॉकर्सचा
वापर करा.
तुम्हाला काय हवय म्हणता ? कर्ज हवय ?
देऊ की . . . अगदी आनंदानं। कर्ज
कशासाठी हवय, ती योजना व्यवस्थितपणे
आमच्या समोर मांडा म्हणजे त्यावर
विचार करून योग्य निर्णय घ्यायला
आम्हालाहि सोपं जाईल आणि तुमचंही
काम होईल.

लोक मंगल ... आवर्त ... शुभमंगल ...
सदाफुली... कोणत्याही योजनेत सामील व्हा.
अन् तुमचा व्यवसाय काय म्हणतोय? छान
चाललय ना सारं? 'यत्न तो देव जाणावा'
हे पटतं बुवा तुमच्याकडे पाहून ... तुमच्या
प्रगतीला हातभार लावता आला म्हणून
खुप समाधान वाटतय आम्हाला.
या ... सारे या... स्वागतम्... सुस्वागतम्
ही बँक तर तुमचीच आहे... जिव्हाळ्याची।

बँक ऑफ महाराष्ट्र
( भारत सरकारचा उपक्रम )
मुख्य कार्यालय : पुणे ४११ ००२.

बँकिंग सेवा व्यक्तिगत जिव्हाळा

PRATIBHA 78-135